**Walwa Taluka Education Society's**

# Malati Vasantdada Patil Kanya Mahavidyalaya, Islampur.

## Vivek Vahini Cell

## Annual Report Year 2022-2023

There is an MOU between Malati Vasantdada patil Kanya Mahavidyalaya Islampur and MaharashtraAndhshraddha Nirmulan Samiti (Rationalist Movement), Islampur Branch. Many activities are organized jointly by our college and Maharashtra Andhashraddha Nirmulan Samiti throughout the year.Vivek Vahini is an extension unit of Maharashtra Andhashraddha Nirmulan Samitee. Vivek vahini is formed before 20 years with the objective to create and cultivate scientific attitude amongst students and community. This unit in the college aims at the eradication of superstitions and promotion of scientific approach in consistent collaboration of MoU with the Andhashraddha Nirmulan Samitee.

**Activities Organized in year are as follows –**

1) **2nd October 2022** – On the occasion of Mahatma Gandhi Jayanti, Vivek Prabodhini organizes a one day workshopon 'Scientific Senses' in the guidance of Dr. Ram Ghule, Dr. Nitin Shinde, Mr.Sanjay Bansode, Mr. Bhaskar Sadakale.

2) **20th October 2022** – Vivek Prabodhini and Maharashtra Andhashradda Nirmulan Samitee jointly organizesintercollege Essay Competition.

3) **21st October 2022** – 'Crackers free Diwali Program' was implemented on this day. A discourse on 'Side effects ofthe Crackers on environment by Prof. K. B. Patil' was organised.

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur Dist.Sangli

4) **19th October 2022** – Prof. K. B. Patil has given a lecture on 'Solar Eclipse- conception- misconception'.

5) **26th November 2022** – Reading on the Introductory of the Constitution was taken. On this day, Principal Dr.Ankush Belvatkar sir guided all.

6) **3rd Janaury 2023** – On the occasion of Krantijyoti Savitribai Phule birth Anniversary, 'Teacher's Day(Shikshika Divas)' was organized under the MoU of Malati Vasantdada Patil Kanya Mahavidyalaya and Maharashtra Andhashraddha nirmulan Samitee, , Prof. Varsha Upase-Patil has given a speeh on'Savitribai Phule- The Forerunnerof Women's Eduction.

IQAC,
Co-ordinator,
Malati Vasantdada Patil Kanya
Mahavidyalaya, Islampur

PRINCIPAL,
MALATI VASANTDADA PATIL
KANYA MAHAVIDYALAYA.
(Arts & Commerce)
Islampur-415409 Dist Sangli

M.V.P. Kanya Mahavidyalaya
Estd.1989
Islampur, Dist.Sangli

वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

# मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

"विवेक प्रबोधिनी" Internal quality Assurance Cell

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीअग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत

## वैज्ञानिक जाणिवा एकदिवसीय कार्यशाळा

## कार्यक्रम पत्रिका

दि. ०२/१०/२०२२ वेळ: स. ८.३० ते दु. ११.३० वार : रविवार ठिकाण : सेमिनार हॉल

**प्रथम सत्र** ( वेळ: स. ८.३० ते दु. ९.०० )

**मार्गदर्शक :- डॉ. राम घुले**

**विषय :- संत -समाजसुधारक आणि अंधश्रद्धा निर्मूलन**

**अध्यक्ष :- प्रा. शेखर खोत**

**व्दितीय सत्र** ( वेळ: स. ९.०० ते दु. ९.४५)

**मार्गदर्शक :- मा. संजय बनसोडे**

**विषय :- श्रद्धा अंधश्रद्धा**

**अध्यक्ष :- प्रा. बी. डी. खामकर**

**तृतीय सत्र** ( वेळ: स. १०.०० ते दु. १०.४५)

**मार्गदर्शक :- प्रा. डॉ. नितीन शिंदे**

**विषय :- वैज्ञानिक दृष्टिकोन**

**अध्यक्ष :- प्रा. एन. एस. डामसे**

**चतुर्थ सत्र** ( वेळ: स. १०.४५ ते दु. ११.३०)

**मार्गदर्शक :- मा. भास्कर सदाकळे**

**विषय :- हसत-खेळत विज्ञान**

**अध्यक्ष :- प्रा. डॉ. अशोक मरळे**

**सूत्रसंचालन :- प्रा. के. बी. पाटील**

| समन्वयक | शाखा अध्यक्ष | प्राचार्य |
|---|---|---|
| प्रा. के. बी. पाटील | मा. बी. आर.जाधव (मअंनि समिती,इस्लामपूर) | डॉ. अंकुश बेलवटकर |

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur Dist. Sangli

वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे ,

# मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

## “विवेक प्रबोधिनी”

## Internal quality Assurance Cell

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

## अग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत

## "वैज्ञानिक जाणिवा" एकदिवसीय कार्यशाळा

## अहवाल

**दि. ०२/१०/२०२२ वेळ: स. ८.३० ते दु. ११.३० वार : रविवार ठिकाण : सेमिनार हॉल**

"ग्रहस्थितीचा मानवी जीवनाशी कार्यकारणसंबंध वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेला नाही. त्या कार्यकारणसंबंधावर ज्योतिषशास्त्र आधारित नाही त्यामुळे ते फसवे असून कुंडली काढणारे व राशीचे खडे देणारे लोकांची फसवणूक करतात.तो त्यांचा मार्केटिंग फंडा आहे. तसेच लग्न ठरविताना ३६ गुण जुळविणे हा प्रकार वर्ण जाती व्यवस्थेला खतपाणी घातले जाते. त्यामुळे तरुणांनी त्याच्या होळ्या कराव्यात".

ते येथील मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या वैज्ञानिक जाणीव एकदिवशीय कार्यशाळेमध्ये द्वितीय सत्रात बोलत होते. मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या एम ओ यु करारा अंतर्गत संयुक्त विद्यमाने आयोजित,महाविद्यालयाच्या 'विवेक प्रबोधिनी' विभाग आणि अग्रणी महाविद्यालय प्रायोजित एकदिवसीय कार्यशाळेमध्ये बोलत होते.

तृतीय सत्रामध्ये बोलताना प्रसिद्ध वक्ते व संशोधक डॉ नितीन शिंदे पुढे म्हणाले, "अनादी कालापासून आकाशातील ग्रह ताऱ्यांचे मानवास आकर्षण राहिले आहे. आकाशातील

M V P Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur Dist.Sangli

तारकापुंजाच्या समूहास मानवाने नक्षत्र कल्पिले. ग्रहगोलांचे मानवी जीवनावर परिणाम होतात असा भ्रम निर्माण करून विशिष्ट वर्गाने समाजाचे शोषण चालविले. राहू- केतू,कडक मंगळ, गुरु, शनि ग्रहांचा अरिष्ठ व भीती दाखवली. शेकडो प्रकाश वर्षे दूर असलेल्या ग्रहताऱ्यांचा धाक दाखवून आणि खगोलीय घटनांचा गैरफायदा घेऊन जन्मपत्रिका, लग्न कुंडली, शनीची साडेसाती, कालसर्पयोग व गुरुपुष्यामृत योग या नावाखाली समाजाला ठकविले व लुटले. गुणमिलनाचे गौडबंगाल सुरू केले. फलज्योतिष्य राशीचे खडे व वास्तुशास्त्र हा फसवणुकीचा फंडा आहे. जाती-वर्ण व्यवस्थेला पूरक असणारी ही थोतांडे टाकून समाजाने बंधुभाव जोपासून एक व्हावे. मानवतावादी विज्ञानवादी जीवन जगावे."

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे व्दितीय सत्रात मार्गदर्शन करताना म्हणाले, "अंधश्रद्धा सोडा, बुद्धिप्रामाण्यवादी व्हा. धर्म संस्कृतीची चिकित्सा करा. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करा. तरच भारत जागतिक महासत्ता बनेल. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे जेवढा पुरावात तेवढाच विश्वास. वैज्ञानिक दृष्टिकोन विचार पद्धतीमध्ये स्वायत्तता, निर्भयता व नम्रता विकसित झाली पाहिजे. श्रद्धा व अंधश्रद्धा वैज्ञानिक कसोटीवर तपासून पाहिल्या पाहिजेत. आजही गुप्तधनापोटी नरबळी देण्याचे अघोरी प्रकार घडतात. बुवा-बाबा भटजींचे अमाप पीक आले आहे. अशा परिस्थितीत आपणास डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांची गरज आहे."

प्रथम सत्रमध्ये संत-समाज सुधारक व अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावरती बोलताना प्रा. डॉ.राम घुले म्हणाले,"9 ऑगस्ट 1989 रोजी शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांनी पुणे येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे स्थापना केली. अंधश्रद्धा मुक्त विवेकी समाजाच्या निर्मितीसाठी बांधिलकी असलेल्या या संघटनेस शोषणमुक्त धर्माची कालसुसंगत चिकित्सा करणारा, संत-समाजसुधारकांचा वारसा जपणारा समाज निर्माण करणे व भारतीय संविधानाचा मूल्यआशय कृतिशील करणे अश्या वैचारिक भूमिकेतून संघटनेची वाटचाल सुरू आहे. समितीचा देव धर्म व श्रद्धेला विरोध नसून त्या नावाखाली केल्या जाणाऱ्या शोषणाला विरोध आहे अशी समितीची भूमिका आहे.भारतीय जीवन बहुदेवतावाद, चमत्कार व अधिभौतिक कल्पनांनी व्यापलेले आहे. गौतम बुद्धांच्या पासून मध्ययुगातील संतपरंपरेने अंधश्रद्धा, बहुदेवता, पाखंडीपणा, भोंदूगिरी, तांत्रिक-मांत्रिकतेला अभंग व भारुडातून प्रखर विरोध केला. संत नामदेव

M.V.P. Kanya Mahavidyalaya, Islampur, Dist. Sangli

संत ज्ञानदेव संत तुकाराम महाराजांनी भोंदू बुवा मांत्रिक पुरोहित भटजी यांच्या शोषणातून बहुजन समाजाला मुक्त केले. जंतर-मंतर,चेटूक-मेटूक, करणी-मारणी या अघोरी प्रथा तसेच यज्ञ-याग जप- तीर्थक्षेत्र,व्रतवैकल्य जत्रा-यात्रा-फित्रा यावर टीका करून समाजाचे प्रबोधन केले. महाराष्ट्रातील बाळशास्त्री जांभेकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले,लोकहितवादी, आगरकर, महर्षी शिंदे, राजर्षी शाहू, संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, प्रबोधनकार ठाकरे व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी देवधर्माची चिकित्सा करून अनिष्ट रूढी प्रथेतून समाजास मुक्त केले. समाजधारकांनी अंगारे -धुपारे, भानामती, गंडदोरे,ताईत, वाघ्या मुरळी पशुबळी अशा अनेक अनिष्ट रूढीतून समाज मुक्त करून तो अधिक निर्भय शोषणमुक्त नीतिमान व विवेकशील बनविला."

कार्यशाळेच्या चौथ्या सत्रामध्ये भास्कर सदाकळे यांनी बुवा-बाबा हातचलाखी करून समाजाला कसे बसवितात, याची प्रात्यक्षिके करून दाखविली. तांत्रिक मांत्रिक हे चमत्कार करताना विज्ञान, तंत्रज्ञान आणि हातचालाखी करून भक्तांना फसवतात. शारीरिक मानसिक व आर्थिक शोषण करतात. भूतबाधा-करणी-मुंज्या उतरविण्याच्या नावाखाली शारीरिक शोषण करतात. गुप्तधनाचे आमिष दाखवून नरबळी देतात. फसवणूक झाली तर लोकांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांच्याकडे यावे किंवा पोलीस स्टेशनला दाद मागावी. भारतीय समाजात असलेल्या अनिष्ट, अमानुष रूढी, अंधश्रद्धेतून होणारे शोषण व छळ थांबविण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणाविरोधी कायदा 2013 साली अस्तित्वात आला. भूतबाधा काढणारे भानामती उतरविणारे चेटूक देणारे करणे देणारे अनेक देवऋषी व भोंदू समाजात आहेत.आज लोकांचे छळ कपट करून त्यांना आपले बळी बनवितात. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा."

कार्यशाळेचे समन्वयक भूगोल विभाग प्रमुख प्रा. के. बी. पाटील यांनी कार्यशाळेचे उत्कृष्ट संयोजन-सूत्रसंचालन केले. कार्यशाळेमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती सादर करून अभिवादन करण्यात आले.कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक करताना ते म्हणाले,"अंधश्रद्धा निर्मूलन समिती समाजातील दुष्ट रूढी-अंधश्रद्धा निर्मूलन, जातीयंत संकल्प, महिला सक्षमीकरण, जोडीदाराची विवेकी निवड, विज्ञान बोधवाहिनी व कार्यकर्ता प्रशिक्षण इत्यादी द्वारे समाज पुरोगामी बनविण्याचा प्रयत्न करते."त्याच्या सतरा अध्यक्षपदी प्रा बि.डी. खामकर व प्रा शेखर खोत हे होते. प्रा. डॉ. अशोक मरळे व प्रा निलेश डामसे हे उपस्थित होते.

M.V.P Kanya Mahavidyalaya Estd. Islampur Dist. Sangli

कार्यशाळेमध्ये ६० विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समिती क्रियाशील सभासदत्वाचे फॉर्म भरून घेण्यात आले. विद्यार्थिनींना कार्यशाळेची प्रमाणपत्रे वाटण्यात आली. कु. नेहा पाटील व वैष्णवी औंधकर यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यशाळेची समाप्ती झाली.

PRINCIPAL,
MALATI VASANTDADA PATIL
KANYA MAHAVIDYALAYA,
(Arts & Commerce)
Islampur-415409. Dist. Sangli

| समन्वयक | शाखा अध्यक्ष | प्राचार्य |
| --- | --- | --- |
| प्रा. के. बी. पाटील | मा. बी. आर.जाधव | डॉ. अंकुश बेलवटकर |

(मअंनि समिती,इस्लामपूर)

M.V.P. Kanya Mahavidyalaya
Estd.1989
Islampur Dist. Sangli

वैज्ञानिक जाणीवा एकदिवसीय कार्यशाळा

2 आक्टोबर 2022










M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur, Dist. Sangli

## वैज्ञानिक जाणीवा एकदिवसीय कार्यशाळा

2 आक्टोबर 2022










M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur, Dist. Sangli

# फलज्योतिष, वास्तुशास्त्र फसवणुकीचा फंडा : डॉ.नितीन शिंदे

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**इस्लामपूर :** प्रहगोलांचे मानवी जीवनावर परिणाम होतात असा भ्रम निर्माण करून विशिष्ट वर्गाने समाजाचे शोषण चालविले. फल ज्योतिष्य, राशीचे खडे व वास्तुशास्त्र फसवणुकीचा फंडा आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते व संशोधक डॉ.नितीन शिंदे यांनी केले.

येथील मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयामध्ये आयोजित वैज्ञानिक जाणीवा एकदिवसीय कार्यशाळेमधील तृतीय सत्रात बोलत होते. प्रसिद्ध वक्ते व संशोधक डॉ.नितीन शिंदे म्हणाले, अनादी कालापासून आकाशातील ग्रह ताऱ्यांचे मानवास आकर्षण राहिले आहे. आकाशातील तारकापुंजाच्या समूहास मानवाने नक्षत्र कल्पिले. राहू-केतू, कडक मंगळ, गुरु, शनि ग्रहांचा अरिष्ट व भीती दाखवली. शेकडो प्रकाश वर्षे दूर असलेल्या ग्रहताऱ्यांचा धाक दाखवून आणि खगोलीय घटनांचा



मालती कन्या महाविद्यालयात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना डॉ.नितीन शिंदे..

गैरफायदा घेऊन जन्मपत्रिका, लग्न कुंडली, शनीची साडेसाती, कालसर्पयोग व गुरुपुष्यामृत योग या नावाखाली समाजाला ठकविले व लुटले. गुणमिलनाचे गौडबंगाल सुरू केले. जाती-वर्ण व्यवस्थेला पूरक असणारी ही थोतांडे टाकून समाजाने बंधुभाव जोपासावे. मानवतावादी-विज्ञानवादी जीवन जगावे. कार्यशाळेच्या चौथ्या सत्रामध्ये भास्कर सदाकळे यांनी बुवा-बाबा हातचलाखी करून समाजाला कसे फसवितात याची प्रात्यक्षिके करून दाखविली. तांत्रिक-मांत्रिक हे चमत्कार करताना विज्ञान, तंत्रज्ञान आणि हातचलाखी करून भक्तांना फसवतात. शारीरिक मानसिक व आर्थिक शोषण करतात. भूतबाधा-करणी-मुं ज्या उतरविण्याच्या नावाखाली शारीरिक शोषण करतात. गुप्तधनाचे आमिष दाखवून नरबळी देतात. फसवणूक झाली तर लोकांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांकडे किंवा पोलीस स्टेशनला दाद मागावी. भारतीय समाजात असलेल्या अनिष्ट, अमानुष रूढी, अंधश्रद्धेतून होणारे शोषण व छळ थांबविण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणाविरोधी कायदा २०१३ साली अस्तित्वात आला. भूतबाधा काढणारे, भानामती उतरविणारे, चेटूक देणारे, करणी करणारे अनेक देवऋषी-भोंदू समाजात आहेत. अशा लोकांचा छळ-कपट करून त्यांना आपले बळी बनवितात. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा. कार्यशाळेचे समन्वयक भूगोल विभागप्रमुख प्रा.के.बी.पाटील स्वागत व प्रास्ताविकात म्हणाले, अंधश्रद्धा निर्मूलन समिती समाजातील दुष्ट रूढी-अंधश्रद्धा निर्मूलन, जातीअंत संकल्प, महिला सक्षमीकरण, जोडीदाराची विवेकी निवड, विज्ञान बोधवाहिनी व कार्यकर्ता प्रशिक्षणद्वारे समाज पुरोगामी बनविण्याचा प्रयत्न करते. कार्यशाळेच्या सत्रअध्यक्षपदी प्रा.बी.डी.खामकर व प्रा.शेखर खोत हे होते. प्रा.डॉ.अशोक मळे व प्रा.निलेश डामसे उपस्थित होते. कु.नेहा पाटील व वैष्णवी औंधकर यांनी आभार मानले.

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur Dist.Sangli

# Malati Vasantdada Patil Kanya Mahavidyalaya,Islampur

## ANTI CRACKER MOVEMENT

2022-23

Chief Guest :- Prof.K.B.Patil

Presedent :- Prin.Dr.A.L.Belvetkar

Presence :- Prof.Dr.Sou.S.R.Hegiste, Prof.Dr.R.G.Ghule.

Date :- 21/10/2022










M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur,Dist.Sangli

# Malati Vasantdada Patil Kanya Mahavidyalaya,Islampur

## ANTI CRACKER MOVEMENT

2022-23

Chief Guest :- Prof.K.B.Patil

Presedent :- Prin.Dr.A.L.Belvetkar

Presence :- Prof.Dr.Sou.S.R.Hegiste, Prof.Dr.R.G.Ghule.

Date :- 21/10/2022










M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur.Dist.Sangli

# फटाक्यांमुळे श्वसनाचे विकार बळावतात : प्रा.पाटील

प्रतिनिधी
इस्लामपूर

फटाक्यांच्यामुळे ध्वनी, वायू व भू प्रदूषण होते. अपघाताने भाजणे व आग लागणे अशा समस्या निर्माण होतात. फटाक्यामध्ये तांबे व कॅडमियमसारखे विषारी घटक असतात, जे हवेत धुलिकण स्वरूपात बराच काळ राहतात. त्यामुळे श्वसनाचे विकार बळावतात, असे प्रतिपादन प्रा. के. बी. पाटील यांनी केले.

येथील मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयामध्ये फटाके मुक्त दिवाळी अभियानामध्ये ते बोलत होते. अंधश्रद्धा निर्मूलन समिती व महाविद्यालयाच्या विवेक प्रबोधिनी मार्फत घेण्यात आलेल्या अभियानात बोलताना ते पुढे म्हणाले, फटाक्यांच्या धुरातून कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, मॅग्नेशियम ट्राय ऑक्साईड अशाप्रकारचे अत्यंत विषारी घटक बाहेर पडतात. त्यामुळे दमा, ब्रॉन्कायटिस (फुफ्फुसाच्या नळ्यांना सूज), श्वसनसंबंधी घुरघुर, खोकला, एलर्जी, हृदयरोग, हार्ट फेल्युअर व फुफ्फुसाची क्षीण अशा प्रकारचे विकार



इस्लामपूर : येथील मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयात बोलताना प्रा. के. बी. पाटील व्यासपीठावर प्राचार्य अंकुश बेलवटकर व अन्य.

लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना जडतात. मोठ्या फटाक्यांचे आवाज १०० डेसिबल पेक्षा जास्त असतात. फटाक्यांच्यामुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणामुळे रक्तदाबात वाढ, चिडचिड, मानसिक व भावनिक ताण, श्रवणदोष, आम्लपित्तात वाढ इ. दुष्परिणाम संभवतात. रात्री-अपरात्री उडवलेल्या फटाक्यांमुळे निद्रानाश होतो. लहान मुले, वयोवृद्ध, रुग्ण यांचा जीव घाबरतो. अभ्यासात व्यत्यय येतो. पशु-पक्षी बिथरतात.

ते म्हणाले, वर्षातून किमान तीन ग्रहणे येतातच. सूर्याची कोणतीही घातक किरणे ओझोन वायूच्या थरात शोषली जातात. त्यामुळे त्याचे कोणतेही वाईट परिणाम माणसं किंवा लहान मुले व वृक्षांच्या वर होत नाहीत. सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण ही खगोलीय घटना असून त्याचे कोणतेही अनिष्ट परिणाम मानवावर होत नाहीत. त्यामुळे ग्रहणे पाळणे सोडून द्यावे. जगातील कोणत्याही धर्मात ग्रहणे पाळत नाहीत. त्यांचे काहीही वाईट होत नाही.

प्रा. डॉ. राम पुरी म्हणाले, फटाक्यांवरील खर्च हा त्यातील एक अनुत्पादक खर्च आहे. फटाके उडवणे म्हणजे पैसा जाळणे. अशा खर्चाने मालमत्ता उभारली जात नाही व महागाई वाढते. आर्थिक प्रगती खुंटते. भारताच्या आर्थिक प्रगतीत फटाके मारक आहे. फटाके

प्रा. डॉ. म्हणाले,

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य बेलवटकर म्हणाले,

२०० विद्यार्थिनींनी फटाके न कार्यक्रमास प्रा. डॉ. प्रा. डॉ. पाटील, प्रा. डॉ. पाटील, प्रा. डॉ. पाटील, प्रा. व शिक्षकेतर उपस्थित होते.

M.V.P. Kanya Mahavidyalaya
Estd.1989
Islampur, Dist. Sangli

# मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

विवेक प्रबोधिनी

आणि

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा, इस्लामपूर

यांच्या संयुक्त विद्यमाने

"मराठी निबंधलेखन स्पर्धा"

**विषय.–** 1) संताचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य

2) वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आपण

3) अंधश्रद्धेची दुनिया.... चमत्काराची किमया

4) फलज्योतिष एक थोतांड

5) अंधश्रद्धा बुवाबाजी व चमत्कार विरोधी कायदा

6) दृष्ट प्रथा व अंधश्रद्धा निर्मूलनातील समाजसुधारकांची कार्ये

7) लग्न पत्रिकेतील छत्तीस गुणमिलनाचे गौडबंगाल

8) नक्षत्र खड्यांच्या अंगठ्या

**बक्षीस.–** प्रथम कंमाक 301 रूपये व प्रमाणपत्र

द्वितीय कमांक 201 रूपये व प्रमाणपत्र

तृतीय कमांक 101 रूपये व प्रमाणपत्र

**नियम व अटीः–**

1 निबंध मराठी भाषेत लिहावेत.

2 स्पर्धकांनी एकाच विषयावर लिहावे.

3 निबंधाची शब्दमर्यादा 600 ते 800 असावी.

4 निबंधाच्या पहिल्या पानावर आपले नाव, पत्ता, वर्ग, मो. नंबर व विषय लिहावा.

5 निबंध सुवाच्च अक्षरात व योग्य समाज सोडून व मुद्देसुद लिहावा.

❖ निबंध पाठविण्याची अंतिम तारीख 20 ऑक्टोबर 2022 राहील.

IQAC,
Co-ordinator,
Malati Vasantdada Patil Kanya
Mahavidyalaya, Islampur

M.V.P. Kanya Mahavidyalaya, Estd.1989, Islampur, Dist. Sangli

PRINCIPAL,
MALATI VASANTDADA PATIL
KANYA MAHAVIDYALAYA
(Arts & Commerce)
Islampur-415409 Dist Sangli

# निबंध स्पर्धा निकाल

प्रथम कमांक.

1) कु. सुकन्या अशोक पाटील. B. A. I.

द्वितीय कमांक.

2) कु. साक्षी राजेंद्र निकम. B. Com. I.

तृतीय कंमाक.

3) कु. रजिया अलताफ मुलाणी. B. Com. III.

उत्तेजनार्थ

1) कु. श्रद्धा श्रीराम मोरे. B. Com. I.

IQAC,
Co-ordinator,
Malati Vasantdada Patil Kanya
Mahavidyalaya, Islampur

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur Dist. Sangli

PRINCIPAL,
MALATI VASANTDADA PATIL
KANYA MAHAVIDYALAYA.
(Arts & Commerce)
Islampur-415409 Dist. Sangli



"Bahujan Hitaya,Bahujan Sukhaya"



Walwa Taluka Education Society's

# MALATI VASANTDADA PATIL KANYA MAHAVIDYALAYA,ISLAMPUR

TAL-WALWA,DIST-SANGLI

## CERTIFICATE OF MERIT

This is to certify that,

Ku/~~Miss~~ Sakshi Rajendra Nikam

Of Class B.Com-I For Securing Second

Rank In Essay Writing In The Year : 2022 -2023

Place: Urun-Islampur

Date: 10/5/2023

SECRETARY
College Gymkhana

Principal
M.V.P.Kanya Mahavidyalaya,Islampur

# मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर.

## निबंध स्पर्धा.

### विषय :- अंधश्रद्धा, बुवाबाजी व चमत्कार विरोधी कायदा.

नाव :- कु. सुकन्या अशोक पाटील.

वर्ग :- B.A.I

पत्ता :-

मोबाईल नंबर :- 9356586323

M.V.P. Kanya Mahavidyalaya
Estd. 1989
Islampur, Dist. Sangli

# अंधश्रद्धा, बुवाबाजी व चमत्कार विरोधी कायदा...

अांधळेपणाने एखादी गोष्ट स्वीकारणे यास अंधश्रद्धा असे म्हणतात. अंधश्रद्धेमध्ये विविध प्रकार आहेत. यामध्ये काळी जादू, तंत्र-मंत्र, जादूटोणा, नरबळी, नजर टोक, तसेच भूत-प्रेत. या संबंधित अंधविश्वास, अफवा पसरवणे व कृती करणे तसेच या कृतींचाही इतर प्राणी जीवनावर विपरीत परिणाम होतो. भारतात अंधश्रद्धा निर्मूलनाची परंपरा फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. बाराव्या-तेराव्या शतकात मराठी संतांनी केलेली धर्मचिकित्सा व अंधश्रद्धा विरोधी केलेली जागृती हा अंधश्रद्धा निर्मूलनाचा महाराष्ट्रातील पहिला प्रयत्न होता, असे ठामपणे म्हणू शकतो. अज्ञानी, अगतिक समाजाला ज्ञानाकडे घेऊन जाणे ही अंधश्रद्धा निर्मूलनाची पहिली पायरी असते.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा अमलात यावा यासाठी कायदा केला जावा म्हणून सुमारे सोळा वर्षे संघर्ष केला. त्यांच्या मागणीनुसार सरकारने विधेयक तयार केले आणि ते विधेयक विधिमंडळात मंजुरीसाठी मांडण्यात आले. पण तेथे ते चौदा वर्ष अडकले होते. जेव्हा दाभोलकर यांची अत्यंत अमानुष हत्या झाली. त्यांच्या दुसऱ्या दिवशी घाईघाईने सरकारने तो कायदा वटहुकूम काढून अमलात आणला आहे.

बुवाबाजी विरुद्धची लढाई ही 'महाराष्ट्र अंनिस' मधील एक मोठे कुतूहल व आकर्षण राहिलेले आहे. बुवाबाजी तशी अनेक प्रकारची चालू असे. कथित बाबा-बुवा, स्वामी महाराज, मांत्रिक, देवऋषी, संत-महंत अशी अनेक नावे धारण करून स्वतःच्या दैवी शक्तीचा, दैवी चमत्काराचा कधी उघड, तर कधी छुप्या पद्धतीने प्रसार करत.

जनतेची दिशाभूल व फसवणूक करीत धंदा करीत असतात. त्या प्रत्येकाचे मंत्र-तंत्र, गिऱ्हाईक, कार्यपद्धती वेगवेगळी असते. यापैकी चमत्काराशी जोडलेली बुवाबाजी ही एक लोकांवर भुरळ पाडणारी आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चळवळीमुळे व बुवाबाजीविरुद्धच्या संघर्षामुळे; तसेच जादूटोणा विरोधी कायद्यामुळे महाराष्ट्रभर चमत्कारा-बद्दल मोठी जनजागृती झाली. याचा परिणाम महाराष्ट्रात चमत्काराचा दावा करुन बुवाबाजी करणारे बुवा-बाजी करणारे बुवा-बाबा आता तुलनेने कमी झाले आहेत.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने सुरुवातीपासूनच अशा सर्वदूर पसरलेल्या बुवाबाजीपासून लोकांची फसवणूक व शोषण होऊ नये; तसेच अज्ञानावर आधारलेल्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने; तसेच समाजातील सर्वसामान्यांचे शोषण व फसवणूक होण्यापासून रोखण्यासाठी कायदा करण्याची मागणी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी मागणी करुन जाहिरनामा प्रसिद्ध केला होता. पुढे १९९५ साली शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेवर असताना आमदार पी. जी. दस्तूरकर यांनी कायद्याबाबतच्या अशासकीय ठराव ७ जुलै १९९५ ला विधानपरिषदेमध्ये मांडला. तो २८ विरुद्ध ७ मतांनी मंजूरही झाला; परंतु पुढे काहीही झाले नाही. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक-कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली निरंतर, सतत कायद्याचा पाठपुरावा व त्यासंबंधी अनेक वेळा विविध प्रकारची आंदोलने, धरणे, मोर्चे असा संघर्ष चालूच ठेवला. शेवटी डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या खुनानंतर महाराष्ट्रात व महाराष्ट्रा-बाहेरील दबावाखाली १८ वर्षाच्या प्रदीर्घ संघर्षानंतर कायदा मंजूर झाला; परंतु त्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा बळी गेला. या कायद्याच्या मसुद्या-मध्ये अनेक तरतुदी सुरुवातीला होत्या; परंतु नंतर शेवटी बऱ्याच तरतुदी कमी केल्या गेल्या. शेवटी कायदा होणे, हे महत्त्वाचे होते.

या कायद्याचे नाव 'महाराष्ट्र नरबळी' आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्या-बाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३ असे आहे. या कायद्यास 'जादूटोणाविरोधी कायदा' असेही म्हणतात. हा कायदा झाल्यानंतर चमत्काराचे दावे करणारे बाबा-बुवा आज जवळजवळ बंद झाले आहेत. कायदा होण्यापूर्वी काही बाबा-बुवा

असे चमत्कारांचे दावे करीत होते. परंतु 'अंनिस' ने त्यांच्या दाव्यांचा भांडाफोड करून; तसेच त्यांना चमत्कार सिद्ध करण्याचे आव्हान देऊन त्यांचे दावे ठरविलेले आहेत. आजही 'अंनिस' ने चमत्कार सिद्ध करण्यास २५ लाखांचे जाहीर आवाहन केले आहे. परंतु आजपर्यंत कोणीही चमत्काराचे आव्हान स्वीकारायला तयार नाहीत. त्यामुळे आज चमत्काराच्या आधारे बुवाबाजी करणारे थांबले आहेत. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे वेगवेगळे फंडे वापरुन बुवाबाजीचे वेगळे प्रकार मात्र आजही चालू आहेत. जादूटोणाविरोधी कायद्यामध्ये चमत्कार संबंधी एक तरतूद आहे. ती अनुसूची२ अंतर्गत अशी आहे की, एखादया व्यक्तीने तथाकथित चमत्काराचा प्रयोग प्रदर्शित करुन त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे आणि अशा तथाकथित चमत्कारांचा प्रसार व प्रचार करुन लोकांना फसविणे, त्यांच्यावर दहशत बसविणे, असे आहे. त्यामध्ये विशेष अलौकिक शक्तीचा किंवा दैवी शक्तीचा दावा करुन फसवणारे बाबा-बुवा किंवा कोणीही असा दावा करीत असतील, तर त्यांच्यावर या कायदयाखाली गुन्हा दाखल होऊ शकतो. सिद्ध झाल्यास सजाही होऊ शकते. या कायदयाच्या प्रभावीपणे वापर करुन चमत्कारांच्या घटना आपण बंद करु शकतो.

"महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी व दुष्कर्मी प्रथा आणि काळा जादू अधिनियम २०१३", हा महाराष्ट्र राज्यातील एक गुन्हेगारी कायदा आहे, मुळात हा कायदा २००३ मध्ये जादूटोणा-विरोधी कार्यकर्ते आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस)चे संस्थापक नरेंद्र दाभोळकर (१९४५-२०१३) यांनी तयार केलेला आहे. हा कायदा जादूटोणा, नरबळी, आजार बरे करण्यासाठी काळया जादूचा वापर आणि अशाच प्रकारच्या अनेक कृती ज्यामुळे लोकांच्या अंधश्रद्धांचे शोषण होऊ शकेल त्यांना गुन्हेगारी अपराध ठरविते. वर्षानुवर्ष बंदी घातलेल्या क्रियांची संख्या सतत कमी केली जात होती. दाभोलकर यांच्या हत्येनंतर, २६ ऑगस्ट २०१३ रोजी हे विधेयक मांडण्यात आले आणि नागपूरच्या महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात डिसेंबर २०१३ मध्ये ते औपचारिकपणे मांडले गेले. अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र हे भारतातले पहिले राज्य ठरले.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी शासनाने अनेक कायदे बनवले आहेत. काळी जादू व मनुष्यबळी वर पूर्णपणे बंदी लावण्यात आली आहे. तंत्र-मंत्राने प्रेत आणि आत्मा बोलावणे कायद्याने गुन्हा आहे. लोकांमधील अंधश्रद्धा दूर करून त्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

तथापि, 21 सप्टेंबर 1995 रोजी गणपती दुग्धप्राशन घटनेमुळे हे आपल्या देशाच्या लोकांच्या चमत्काराला शरण जाणाऱ्या मानसिकतेची चुणूक दाखवून गेली. यामुळे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती हा दिवस 'चमत्कार ~~संशोधन~~ सत्यशोधन दिन' म्हणून पाळते. चमत्कारावर विश्वास ठेवणारी मानसिकता अधिक घातक असते. कारण त्यातून स्वतःच्या कर्तुत्वाचा विश्वास गमावून बसतो. चमत्कारांवर विश्वास ठेवणे म्हणजे विज्ञानाचा पायाच नाकारण्यासारखे आहे. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोनाचे मूल्य नाकारणे होय. चमत्काराबद्दल अब्राहम कोवूर म्हणतात, 'जगात कोणीही चमत्कार करू शकत नाही. चमत्कार करण्याचा दावा करणारे बदमाष असतात. चमत्कारावर विश्वास ठेवणारे मूर्ख असतात. चमत्काराला विरोध न करणारे भ्याड असतात.

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur Dist Sangli

PAGE No. :
DATE : / /20

नाव -: साक्षी राजेंद्र निकम.

विषय -: वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आपण.

वर्ग -: B.COM I

पत्ता -: मु. पो. रेठरेधरण. ता. वाळवा,
जि. सांगली

मोबाईल नं -: 9665605039

PAGE No. :

DATE : / /20

वैज्ञानिक दृष्टीकोन हा हल्ली वाक्प्रचार म्हणून वापरला जातो. असं माझं मत आहे. आपल्याला न पटलेल्या गोष्टींवर हा वाक्प्रचार एखादयाच्या तोंडावर फेकून मारला, की मग पुढची चर्चाच खुंटते.

वैज्ञानिक दृष्टीकोन हे वाक्य आपल्या देशात मुख्यत: विज्ञानाशी संबंधीत गोष्टींशी, म्हणजे जे आपण बेसीक विज्ञान समजतो. त्या फिजिक्स, केमिस्ट्री आणि जीव-शास्त्र या तीन शाखांशी, मर्यादीत असतो असा आपला सर्वसाधारण समज. हा घोळ विज्ञान या शब्दांची सांगड सायन्स या इंग्रजी शब्दाशी घातली गेली म्हणून होत असावा. असं मला वाटतं. परंतू विज्ञान तेवढ्यापुरतं मर्यादीत नाही असंही मला वाटतं. रोजच्या जगण्याच्या प्रत्येक गोष्टीत विज्ञान आहे, मग ती कोणतीही साधी गोष्ट असो. उदारणार्थ, मुंबईत बीएसटीच्या बसमधून पुढच्या दरवाजाने का उतरावं, ते एसटी बसच्या कंडक्टरची सीट मागच्या दरवाजापाशी का असते, यातही विज्ञान आहे. किंवा कोणताही कुत्रा धावताना त्याचे पुढचे दोन पाय मागच्या दोन पायांच्या तुलनेत किंचित डावीकडे पडतात. यातही विज्ञान आहेच. या विज्ञानाची सूत्र मांडता येतीलही, परंतू त्यात मुळात काही विज्ञान आहे हेच आपल्या गावी नसतं आणि त्यामुळे असं का? हा प्रश्न आपल्याला पडत नाही, हे मुख्य कारण हे आहे.

विषय कोणताही असो, असं का हा प्रश्न स्वत:ला पडणं म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन असं मला वाटतं. आपण अंधश्रध्दा या लेबलखाली अनेक गोष्टीवर विचार करायचं टाळतो. कारण तसं करणं स्वत:ला शिवण्यापासून वाचवणारं असतं. आपल्या सुरूवातीपासुनच्या अभ्यासक्रमातही

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur, Dist.Sangli

प्रश्न विचारायला वाव ठेवलेला नाही. त्यामुळे आपलं कुतुहल लहान वयातच मारलं जात आणि त्यामुळे आपल्या देशात मूलभूत संशोधन होत नाही. आपल्या देशात 'अंधश्रद्धा' असं नांव दिलं की मग त्यावरची चर्चा टाळली, नव्हे मारली जाते. आपल्या प्राचीन संस्कृत ग्रंथांची अशीच हेळसांड होत होती. जर्मनीतल्या मॅक्समुल्लर या विद्वानाने जेव्हा त्यांचा अभ्यास करून त्याची महती आपल्याला सांगितली. तेव्हा त्यांच महत्व आपल्याला समजलं. हळदीचे औषधी उपयोग आपल्या पूर्वजांना गेल्या शेकडो - हजारो पिढ्या माहित आहेत. त्यांना ते तसं लिहूनही ठेवलं आहे. पण आपलं जे जे प्राचीन ते ते अंधश्रद्धेशी निगडीत अशी काहीतरी विचित्र समजूत आपण करून घेतली असल्याने, आपल्या पूर्वजांनी हळदीविषयी जे लिहून ठेवलंय, ते तसं का लिहिलय या विषयी आपल्याकडे कुतूहल जागृत झालं नाही व म्हणून त्यावर आधुनिक युगात संशोधन झालं नाही. अमेरीकांनी नेमकं हेच टाळलं आणि त्यावर संशोधन केलं आणि ते हळदीचं पेटंट घ्यायल्या गेल्यावर आपण जागे झालो आणि दीर्घ लढाईनंतर ते पेटंट डॉ. रघुनाथ माशेलकरांनी मिळवलं. ही कहाणी सर्वांनाच माहित आहे.

आपल्या प्राचीन प्रथा - परंपरा, दैवत यांचही असंच आहे. त्यामागे निश्चित असा कार्यकारण भाव आहे आणि आपल्या पूर्वजांनी त्याकाळच्या जनमानसाला झेपेल अशा भाषेत तो सांगीतला आहे. यावर आधुनिक युगात विशेष संशोधन व्हायलं हवं. शेवटी विज्ञान या शब्दाचा सामान्य अर्थ विशेष ज्ञान असा होतो. आपल्या या प्रथा - परंपरा किंवा दैवत यावर विशेष ज्ञान

मिळवण्याचा फारसा प्रयत्न आपल्याकडे झालेला नाही आणि या सर्वांकडे अंधश्रद्धा म्हणून शिक्का मारला गेला. या प्रथा परंपरा किंवा दैवत ह्यांचा आता अभ्यास करताना तो त्या काळात जाऊन करावा आणि आधुनिक काळात त्याचा अर्थ काय हे उलगडून सांगणं म्हणजे विज्ञान किंवा वैज्ञानिक दृष्टीकोन असं मी समजतो. यासाठी दैवतांना पुजताना आणि प्रथा पाळताना, दैवत म्हणजे काय आणि प्रथा का पाळावी हे प्रश्न आपल्याला पडणं आणि त्यांचं उत्तर शोधणं आणि त्यातील पटलेल्या गोष्टी घेऊन न पटलेल्या गोष्टींचा त्याग करणं म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन असं मला वाटतं...

पुराणांमध्ये आढळणारे पुष्पक विमान ही चिज आताचं विमानाची मुळ आवृत्ती असं आताच्या काळात आपल्याला पटण्यासारखी नाही हे तर खरंच. परंतू विमानाचा तो उल्लेख त्या काळात आलाय हे ही खरंय; तर मग तो नेमक्या कुठल्या संदर्भात आला किंवा विमान म्हणवली गेलेली ती वस्तू नेमकी काय होती. याचं संशोधन आणि त्या संशोधनाची तर्कसंगत मांडणी म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन असं मला वाटतं.

वैज्ञानिक दृष्टीकोनाचा आग्रह योग्य असला तरी आपल्या आजुबाजूला काही गुढत्व असणं ही मानवी मनाची गरज आहे. असं मला वाटतं. इथे मी प्रख्यात स्त्रीरोग तज्ञ डॉ. बा. नि. पुरंदरेंचं उदाहरण देईन. डॉ पुरंदरे शस्त्रक्रीया करण्यापूर्वी कुंडली बघत असं त्यांनी आपल्या शल्य कौशल्य या पुस्तकांत लिहिलंय. डॉ पुरंदरे डॉक्टर होते म्हणजे त्यांच्या कडे वैज्ञानिक दृष्टीकोन होता असे म्हटले पाहिजे. तरी कुंडलीच्या गुढत्वाविषयी त्यांना आकर्षण होते असं यावरुन

PAGE No. :
DATE : / /20

म्हणावं लागतं. युरोपीय देश किंवा एकुणच पाश्चिमात्य देश नक्कीच वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगणारे आहेत असं आपण समजतो आणि ते बऱ्याच अंशी खरेही आहे. आणि म्हणून त्यांच्याकडे नवनवीन शोध लागत असतात. पण असं तरीही त्यांच्याकडे भुतादी कल्पना आहेत. आणि त्यावर विश्वास ठेवणारी लोकंही आहेत. डिस्कव्हरी किंवा नॅशनल जिओग्राफिक चॅनेल वर 'हाँटींग' या भुतबाधेवर आणि ती भुतबाधा उतरवणाऱ्या लोकांच्या सिरियल्स बघताना हे लक्षात येतं. ही दोनही चॅनल्स वाह्यात गोष्टी दाखवण्यासाठी बदनाम नाहीत. हे लक्षात ठेवायला हवं. तसंच ख्रिश्चन धर्म माणसाला अशक्य आहे. चमत्कारांवर आजही विश्वास ठेवताना दिसतो.

मदर तेरेसांनी डॉक्टरांनी जगण्याची आशा सोडून दिलेला पेशंट बरा करण्याचा चमत्कार करून दाखवला होता. पाद्र्याना फादर किंवा मदर होण्यासाठी चमत्कार दाखवावाच लागतो. त्याशिवाय त्याना फादर किंवा मदर होता येत नाही. इथे ख्रिश्चन धर्माचं उदाहरण एवढ्या साठीच दिलंय, कारण आधुनिक वैज्ञानिक जगतात या धर्माचे अनुयायी जास्त आहेत म्हणून. बाकी जगातील सर्व धर्मात मानवी बुद्धीला न पटणाऱ्या आणि विज्ञानाच्या कसोटीवर न टिकणाऱ्या ह्या गोष्टी कमी - अधिक प्रमाणात आहेतच. आपल्याकडे हेच काम बाबा - बुवा - माँ किंवा माताजी करतात.

आपले प्राचीन ग्रंथ काय किंवा बायबल कुराण, काय यातील घटना आताच्या आपल्या बुद्धीला न पटणाऱ्या आहेत. असं असलं तरी ते ग्रंथ ज्या काळात रचले गेले त्या काळातील लोक, त्यांच्या बुद्धीचं

PAGE No. :
DATE : / /20

त्या काळचं आकलन, त्यांनी तसं लिहिण्यामागचं त्यांचा उद्देश काय असावा आणि त्या आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर कशा पद्धतीने मांडता येतील, ह्याचा विचार करणं म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोनं असं मला वाटतं.

वैज्ञानिक दृष्टिकोण म्हणजे काय ?

* कुठल्याही घटितामागचा कार्यकारणभाव समजून घेणे किंवा दोन घटनांमधील परस्परसंबंध तपासून पाहणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोण. अशी एकदम साधी - सोपी व्याख्या करता येईल. किंवा असंही म्हणता येईल की, जेवढा पुरावा उपलब्ध आहे, तेवढाच विश्वास ठेवणे. एखादी गोष्ट सत्य आहे का नाही यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोण निरीक्षण, तर्क, अनुमान प्रचिती आणी प्रयोग. या मार्गांनी ज्ञान आत्मसात करण्याची विज्ञानाची ही पद्धत आहे.

1) वैज्ञानिक दृष्टिकोण शब्दप्रामाण्य म्हणजे कुणी एका मोठ्या व्यक्तीने सांगितले म्हणून खरे मानायचे, हे नाकारतो. वैज्ञानिक दृष्टिकोण ग्रंथप्रामाण्य म्हणजे कुणाच्या तरी पुस्तकात लिहिलंय म्हणून ते चिकित्सा न करता स्वीकारणे नाकरतो.

2) चमत्काराचा दावा करणे हे लोकांना मूर्खात काढण्याचं प्रभावी साधन आहे. कोणतीही गोष्ट कारणाशिवाय घडत नाही. चमत्कार करणारे बदमाश असतात, त्यावर विश्वास ठेवणारे मुर्ख असतात. आणि याला विरोध न करणारे भ्याड असतात. चमत्कारामागे हातचलाखी वा विज्ञान यापैकी काहीतरी एक असते.

P. Kanya Mahavidyalaya Estd 1989 Islampur Dist Sangli

PAGE No. :
DATE : / /20

3) जगात सुष्ट शक्तिमुळे चांगले आणि दुष्ट शक्तिमुळे वाईट घडते असे अजिबात होत नाही. जे काही घडते त्यामागे निश्चितच कारण असते, आणि ते वैज्ञानिक दृष्टिकोनाच्याच आधारे शोधता येते.

4) आजवर झालेली माणसाची प्रगती केवळ विज्ञानाच्या आधारे झालेली आहे. विज्ञान नेहमीच नम्र असते, ते नवनवीन बदलांना आत्मसात करते. धर्माप्रमाणे ते अंतिम सत्याचा दावा अजिबात करत नाही.

5) मानवाचा आजवरचा इतिहास हा मुद्दा तपासण्याचा इतिहास आहे. विज्ञानामुळे झालेले बदल धर्माला काळाच्या ओघात स्वीकारावे लागले आहेत. आजवर धर्माने एकही मानवी प्रगतीसाठी नवीन शोध लावलेला नाही.

6) वैज्ञानिक दृष्टिकोण आत्मसात करताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे छद्म विज्ञानापासून सावध राहिले पाहिजे. छद्म विज्ञानाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वास्तु शास्त्र ज्योतिष शास्त्र.

7) आज समाजात अनेक गोष्टी यामागे विज्ञान आहे असं सांगून जनसामान्यांच्या माथी थोपवल्या जातात. त्या गोष्टीत नक्की विज्ञान आहे का, हे वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे तपासता येते. विज्ञानाला आज सगळ्या गोष्टींची कारणे माहित नाहीत. पण ती कारणे वैज्ञानिक दृष्टिकोण च्या आधारेच समजू शकतात.

PAGE No. :
DATE : / /20

8) आपल्या जीवनात आज जे जे काही घडतं, त्यामागे पूर्व संचित आहे, नियती आहे, नशीब आहे, पूर्वजन्मीचं पाप आहे. असं समजणं हा पळपुटेपणा आहे.
कष्टाला पर्याय नाही, हे वैज्ञानिक दृष्टिकोण सांगतो.

9) आत्मा - परमात्मा, जन्म - मृत्यू, प्रारब्ध - संचित - नशीब - मोक्ष यांची मांडणी अनेक धर्मांनी, अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने केलेली आहे. व्यक्तीपरत्वे हा गोंधळ बदलू शकतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन हे सारं फसवेपणा नाकारतो. जे विज्ञानाच्या कसोटीवर टिकते, ते ते खरं ... असं वैज्ञानिक दृष्टिकोण सांगतो.

10) धर्माशिवाय माणसाच्या विवेकातून नीती निर्माण होऊ शकते, असं वैज्ञानिक दृष्टिकोण सांगतो.

एक शेवटचं उदाहरण देतो आणि हा विषय आवरता घेतो. आपल्या पुराणांत मारुतीच्या जन्माची कथा आहे. अंजनीच्या पोटी नुकत्याच जन्म घेतलेल्या मारुतीला सूर्यबिंब गिळावेसे वाटते व तो सूर्याच्या दिशेने झेप घेतो असं वर्णन आहे. हे मानवी बुद्धीला न पटणारं आणि शरीरालाही न झेपणारं वर्णन आहे. परंतू यावर थोतांड किंवा अंधश्रद्धा म्हणून शिक्का मारुन चालणार नाही. तर त्याकाळात असं लिहिणारांनी तसं का लिहिलं असेल याचा विचार आजच्या वैज्ञानिक सत्याचा आधार घेऊन करायला हवा तरचं तो वैज्ञानिक विचार म्हणता येईल.

PAGE No. :
DATE : / /20

ही कथा पुढं असं सांगते की मारुतीला फेकून मारतो व ते मारुतीला लागून मारुती बेशुद्ध पडतो. वातावरणाच्या बाहेरील निर्वात पोकळीत वारा पोहोचू शकत नाही. व परिणामी बेशुद्धी येते. हे आपल्याला आधुनिक सायन्स सांगते. मारुती जन्मकथेत रुपाने हे सत्य आधुनिक काळात समोर येत असं मला वाटतं.

आपल्या प्राचीन पूर्वजांना निसर्गाची अफाट ताकद म्हणजे एक चमत्कार वाटला असावा आणि त्या ताकदी पुढे आपली मानवी क्षमता नगण्य वाटली असल्याने निसर्गातील आग, वायु, पाऊस वा वाघ, सिंह, हत्ती, साप आदिंना देवता स्वरुप दिलं गेलं असावं. या देवतांच्या पराक्रमाच्या कथा गुंफल्या गेल्या असाव्यात. आपल्या पुराण कथा, प्रथा - परंपरा यात असाच मोठा अर्थ भरलेला आहे. त्या केवळ भाकडकथा म्हणून हसून सोडून देता कामा नयेत. त्याचा अर्थ शोधून तो जिज्ञासूपर्यंत पोहोचवणं म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन गरजेचं आहे. हे झालं पोथ्या - पुराणांसाठी. जीवनातल्या प्रत्येक गोष्टीमागच्या कार्यकारण भावाचा तर्कसंगत विचार करणं म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोनं असं मी मानतो.

सर्वच गोष्टीबद्दलचं स्वतःचं कुतूहल सतत जागृत ठेवणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन. त्याच निरीक्षण करुन अभ्यास करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन. ज्ञानेश्वर बाराव्या शतकात म्हणून गेलेत, की "अगा अभ्यासाचेनि बळे। एका गाति अंतराळे। व्याघ्र सर्प पांजळे। केले एकीं। विष की आहारी पडे। समुद्री पायवट जोडे। एकी वाग्ब्रह्म थोकडे। अभ्यासे केले।

PAGE No. :
DATE : / /20

म्हणजे अभ्यासामुळे आकाशात विहार करता येतो, अभ्यासामुळे वाघ आणि सर्प एकत्र खेळवता येतो. अभ्यासामुळे समुद्रातून वाट काढता येते. अभ्यासामुळे काहीही करता येते हाच तो वैज्ञानिक दृष्टिकोन... अभ्यामुळे, म्हणजे कुतूहल, निरीक्षण आणि प्रयोगातून काहीही साध्य करता येतं हा विश्वास म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन...

वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय, यावर माझं मत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हेच अंतीम सत्य असं म्हणणं नाही, तर आपली मतंही अपेक्षित आहेत.

3

| |
|---|
| नाव - रजिया अलताफ मुलाणी |
| पत्ता - इस्लामपूर, टकलाईनगर |
| वर्ग - BCOM III |
| मो. नं - 9307643421 |
| विषय - लग्न पत्रिकेतील छत्तीस गुण-मिलनाचे गोडबंगाल |

## ◆ लग्न पत्रिकेतील छत्तीस गुणमिलनाचे गोडबंगाल ◆

"पुसे जन्मकाळ राशीचक्र मांडी,
चाळी बोटे कांडी वेडा जैसा!
त्याहाळूनी सर्व भोळ्या पित्या बोले,
मुळावरी आले बाळ तुझ्या !!

मागणीच्या वेळी जोशीबुवा येई,
राशीबळ पाही दिमाखाने!
स्वहिताची आस न्यून कल्पोनिया,
ग्रह योजूनिया जप स्थापी !!"

पत्रिका जुळत नाही अथवा गुण जुळत नाहीत पुवढ्या कारणास्तव अनेकांची लग्ने मोडतात. पण पत्रिका का जुळत नाहीत? काय कारण आहे हे मात्र वधूवराकडील कोणीही पंचांगकर्त्याला विचारत नाही. गुणमिलन हा प्रकार किती नकलावू, वर्णवर्चस्ववादी, स्त्री-पुरुष असमानतेचे समर्थन करणारा आणि मुख्यत्वे फसवाफसवीचा आहे. हे मात्र समजून घेणे काळाची गरज आहे. मुला-मुलीचे विवाह ठरवताना मुलगा आणि मुलगीचे गुण जुळणे भारतीय समा-जात महत्त्वाचे मानले जाते. यालाच 'पत्रिका जुळवणे' असे समजतात. पत्रिका जुळवण्यासाठी छत्तीस गुणांची परीक्षा असते. त्या परीक्षेत अठरा गुण पडले तरच उत्तीर्ण. पण हे गुण मिळवण्यासाठी मुला-मुलीला कसलाही अभ्यास करावा लागत नाही. आपली पत्रिका दिली की, पंचांगकर्ते किती गुण पडले हे सांगतात. हे गुण कसे दिले जातात? किंवा कसे जुळवले जातात? याबद्दल एक शब्दही मुला-मुलीच्या

पालकांनी भटजीकडे काढू नये ही अस्वस्थ करून सोडणारी गोष्ट आहे. प्रस्थापित व्यवस्थेने संस्कृतीच्या नावाखाली भारतीय समाज किती आंधळा करून सोडला आहे याचे हे बोलके उदाहरण आहे. पालकवर्ग गुण जुळल्याशिवाय मुला-मुलींची लग्नच ठरवत नाहीत. चुकीच्या परंपरांच्या अभिमान बाळगायचा की, आधुनिकतेचा विचार करायचा हे युवकवर्गाने ठरवल्याशिवाय भारत महासत्ता होणे फारच अवघड आहे.

संत तुकाराम म्हणतात

शुभ झाल्या दिशा अवघाची काळ ।
अशुभ मंगळ मंगळाचे ॥
हातिंचिया दीपे दुरावली निशी ॥
न देखिजे कैसी आहे तेही ॥
सुख-दुःखातुनि नाही विपरीत ।
देतील आघात हीनफळे ॥
तुका म्हणे आता आम्हांसी हे भले ।
अवघेचि जाले जीव जंत ॥

गुणमिलनातील छत्तीस गुणांची विभागणी आठ गटांमध्ये केलेली आहे. यापैकी वर्णगुणचक्रमला सर्वात कमी गुण, म्हणजे एक गुण तर नाडीगुणचक्रमला सर्वात जास्त म्हणजे आठ गुण आहेत.

वर्णगुणचक्रम - 1 गुण
वश्यगुणचक्रम - 2 गुण
ताराुणचक्रम - 3 गुण
योनीगुणचक्रम - 4 गुण
ग्रहमैत्रीगुणचक्रम - 5 गुण
गणगुणचक्रम - 6 गुण
राशिकुटगुणचक्रम - 7 गुण
नाडीगुणचक्रम - 8 गुण

1) 'वर्णगुणचक्रम' या गुण प्रकारांचा संबंध मुला-मुलीच्या वर्णाशी जोडलेला आहे. प्रत्येक वर्णातील मुलीला कमी लेखण्याचा हा प्रकार. म्हणजेच वरच्या वर्णातील वराने खालच्या वर्णातील वधूशी लग्न केल्यास एक गुण. परंतु.

Mahavidyalaya Islampur Dist. Sangli Estd.1989

वरच्या वर्णातील वधूने खालच्या वर्णातील वराशी लग्न केल्यास मात्र शून्य गुण. पंचांगकर्त्यांच्या अधिकारामुळे वरच्या जातितील मुलाने खालच्या जातितील मुलीशी लग्न केले तर चालते पण वरच्या जातितील मुलीने खालच्या जातितील मुलाशी लग्न केले तर चालत नाही. कारण काय तर 'खानदान की इज्जत पूरी मिट्टी मे मिल जाती है।' हा विरोधाभास वाटत का? ३] 'वश्यगुणचक्रम' हा वधूवराच्या राशीवर अवलंबून असलेला हा विभाग दोन गुणांसाठी आहे. यात अर्धा गुण देण्याची सुद्धा सोय आहे. बारा राशींची वर्गवारी त्यांनी पाच विभागात केले आहे. आपला मुलगा अथवा मुलगी चतुष्पाद, मानव, जलचर, वनचर किंवा कीटक यापैकी हमखास एका वर्गातला असणारच. भले ते त्यांच्यासारखे दिसत नसले तरी.

चतुष्पाद - मेष, वृषभ
मानव - मिथुन, धनू, कुंभ, कन्या, तूळ
जलचर - कर्क, मीन, मकर
वनचर - सिंह
कीटक - वृश्चिक

चतुष्पाद मध्ये समाविष्ट असलेली मेष म्हणजे मेंढा तर वृषभ म्हणजे बैल. हे चार पायाचे प्राणी आहेत म्हणून त्यांची गणना चतुष्पादमध्ये. मानवामध्ये समाविष्ट असलेली रास म्हणजे मिथुन रास म्हणजे दोन मुले एकमेकांच्या खांदयावर हात टाकलेली, धनू म्हणजे बाण मारत असलेला अर्धा प्राणी तर कुंभ म्हणजे पाणी ओतणारा माणक्या, कन्या म्हणजे खुर्चीत बसलेली मुलगी, तूळ म्हणजे तराजू. सिंह जंगलात राहतो म्हणून वनचर तर वृश्चिक म्हणजे विंचू हा कीटक प्रकारात मोडतो म्हणून कीटक. ७] 'तारागुणचक्रम' हा वधूवरांच्या नक्षत्रांच्या क्रमांकावर अवलंबून असलेला हा गुणांचा प्रकार तीन गुणांसाठी ठेवला आहे. ५] 'योनिगुणचक्रम' हे वधूवरांच्या नक्षत्रांशी संबंधित असून या प्रकारात चार गुण मिळतात. प्रत्येक नक्षत्राला योनी असते असे यांचे अफाट ज्ञान. योनींची नावे फारच वेचक आहेत. उदा. अश्व, सर्प, उंदीर, मुंगुस, वानर, श्वान इत्यादी. माणसाला प्राण्यांच्या योनीशी जोडणारे हे पंचांगकर्ते कोणत्या काळात वावरत आहेत हेच समजत नाही.

5] 'ग्रहमैत्रीगुण' हा वधुवरांच्या राशीवर आधारित असलेला पाचगुणांसाठीचा प्रकार आहे. राशींमध्ये मैत्री आणि शत्रुत्व असते असे यांचे महनीय संशोधन. सिंह राशीचे वृषभ, तूळ, मकर आणि कुंभ हे शत्रू आहेत. त्यामुळे या एकत्रीकरणाला शून्य गुण मिळतात. त्यामुळे वधुवरांच्या राशींमध्ये असे काही आढळल्यास शत्रू बरोबर संबंध ठेवणे योग्य नाही असा समज इथे येतो. वधूवर एकमेकांना पसंत असले तरी आम्ही गुण जुळवण्यासाठी त्यांच्या दारात जातो. त्याच काय आहे, 'दूध दारोदारी जाऊन विकावे लागते पण दारू मात्र दुकानात जाऊन घेतात.' त्यातलाच हा प्रकार. 6] गणगुणचक्रम हा मुला-मुलींच्या गणाशी संबंधीत आहे. सर्व नक्षत्रांची विभागणी तीन गणात केली आहे- देव, मनुष्य किंवा राक्षस.

"असे जगावे दुनियेमध्ये,
आव्हानाचे लावुन अत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये,
आयुष्याला दयावे उत्तर...

नको गुलामी नक्षत्रांची,
भीती आंधळी ताऱ्यांची,
आयुष्याला भिडतानाही,
चैन करावी स्वप्नांची..."

मुलगा-मुलगी एकाच गणातील असतील तर दोघांना ही सहा गुण मिळतात. मनुष्य आणि राक्षस गणातील मुला-मुलींना शून्य गुण मिळतात. यालाच 'गणदोष' म्हणतात. मुलगा किंवा मुलगी स्वभावाने चांगली असणे, इतरांना मदत करणारे, सामाजिक भान जपणारे याला काहीच किंमत गण ठरवताना दिलेली नाही. व्यक्तीच्या नक्षत्रावर देव आणि राक्षस गण ठरत असेल तर दरोडेखोर, भ्रष्टाचारी, गुंड हे देव असणे आणि प्रकाश आमटे, डॉ. नरेंद्र दाभोळकर, डॉ. एम. एम. कुलबुर्गी या व्यक्ती राक्षस गणांत जाण्याची दाट शक्यता आहे. 7] 'राशिकुटगुणचक्रम' हा सात गुणांसाठी असलेला प्रकार आहे. जर मुलीच्या राशीचा क्रमांक 1, 3, 4, 7, 10, 11 यांपैकी आल्यास सात गुण. इतर आल्यास शून्य गुण यालाच 'कुटदोष' म्हणून समजण्यात येते.

४] 'नाडीगुणाचक्रम' हा सर्वात जास्त आठ गुण देणारा आणि भंपकपणाचा कळस असलेला हा विभाग आहे. मुलगा किंवा मुलगीच्या नक्षत्रावरून त्यांना आदय, मध्य, किंवा अंत्य यापैकी एक नाडी मिळते. वधूवराच्या नक्षत्राचे क्रमांक एकाच नाडीमध्ये आल्यास त्याला 'एकनाड' किंवा 'नाडीदोष' समजतात. त्यांना शून्य गुण दिले जाते. तर वेगवेगळ्या नाडीमध्ये आले तर आठ गुण मिळतात.

"असे दांडगी इच्छा ज्याची,
मार्ग तयाला मिळती सत्तर,
नजर रोखूनी नजरमध्ये,
आयुष्ला दयावे उत्तर...

म्हणूनच विंदा करंदीकर म्हणतात -
नको गुलामी नक्षत्रांची,
आव्हानाचे भीती आंधळी ताऱ्यांची,
आयुष्याला भिडतानाही,
चैन करावी स्वप्नांची...
नजर रोखूनी नजरेमध्ये,
आयुष्याला दयावे उत्तर..."

मित्रहो, हल्ली जोरात चालणारा पत्रिकेचा खेळ आणि त्यावर आधारित लग्न जुळवण्याचा प्रकार पाहिला तर हसू येतास्च. अगदी चौथीपासून शिकलेला ग्रह ताऱ्यांचा अभ्यास ज्योतिषवाल्यांनी आपल्या ताब्यात घेतला. आणि उच्चशिक्षितांना आपल्या हातचं बाहुलं बनवलेल आहे. मी तर म्हणतो की, ज्योतिषवाल्यांच्या पत्नीनेच ज्योतिषला खडसावून बोलायला पाहिजे की,

"एवढया दूरवरच्या ग्रहदशा तुम्हाला कळतात,
पण घरात रेशन संपलेल आहे हे बरं कस कळल
नाही ?"

अहो, 'पत्रिका जुळवणे' हा तर केवळ आकड्यांचा खेळ आहे. या खेळात आपण अडकायचं की, मुलगा आणि मुलगीच्या आवडी- निवडीचा विचार करायचा. मुला- मुलीचं वैवाहिक जीवन सुखी आणि समृद्ध करण्यासाठी त्यांच्या स्वभावाची आणि कर्तृत्वाची जुळवा- जुळव करणं इष्ट ठरेल.

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur Dist.Sangli

D D M M Y Y Y Y

सर्वजण पत्रिका पाहतात. म्हणून आम्ही पाहतो, आमचा विश्वास नाही पण मुलीकडच्यांचा आहे, असं शिकलेल्यांनी म्हणणं, म्हणजे समाजसुधारकांचा अपमान ठरेल.

धर्मानं बहुजनांच्या सर्व पत्रिकांना शिक्षणबंदी केलेली होती. मग ही पत्रिकेवरली बंदी घातली कोणी? आणि उठवली कोणी? कोणत्याही ग्रहाची शांती न करता केवळ आणि केवळ शिक्षणामुळेच आपला विकास झालेला आहे, हे अजिबात विसरता कामा नये. मुख्य म्हणजे शिक्षणाची संधी देणारे महात्मा फुले, सावित्रीबाई, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आदींचे योगदान विचारात घ्या आणि आपल्या भावी पिढीला पुढे घेऊन जाणारा मार्ग दाखवा.

आज मानवाने अंतराळ क्षेत्रामध्ये प्रचंड झेप घेतलेली आहे. त्या तुलनेत ज्योतिषी वापरत असलेली ग्रह, नक्षत्रं, रास आदींची माहिती अत्यंत तुटपुंजी आहे. भावी पिढीला आपण कोणत्या गोष्टीमध्ये रममाण व्हायला लावणार आहोत याचा सुज्ञांनी विचार करावा. संशोधनाच्या वाटा निवडून अंतराळात झेप घेण्यातच आपलं हित आहे, ना की पत्रिकेतील ग्रह ताऱ्यांच्या जंजाळात अडकणं.

बहिणाबाई म्हणतात –

"नको नको रे ज्योतिषा
नको हात माझा पाहू,
माझे दैव मला कळे
माझ्या दारी नको येऊ..."

आणि

विंदा करंदीकर म्हणतात –

"असे जगावे दुनियेमध्ये,
आव्हानाचे लावुन अत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये,
आयुष्याला द्यावे उत्तर..."

४

नाव- श्रद्धा श्रीराम मोरे
वर्ग- FYBA
पत्ता- मु:पो- ढगेवाडी ता- वाळवा जि- सांगली
मोबाईल नंबर- 7028971042

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1989 Islampur Dist.Sangli

## • वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आपण •

अंधश्रद्धा जणूकाही आपल्या भारतमातेवरील एक कलंकच! समाजाला लागलेली जणू कीडच! आज आपण २१ व्या शतकात वावरत आहोत, पण अंधश्रद्धा असूनही ती नष्ट करण्यात आपण अपयशीच ठरलो. तुम्ही म्हणत असाल... अरे, भारताने अवकाशात उपग्रह सोडले, संगणकात प्रगती केली असे विविध वैज्ञानिक चमत्कार आपण वर्तमानपत्रात वाचलो. एवढी मोठी विज्ञानक्षेत्रात झेप घेतली तरी तुम्ही म्हणता आपल्याकडे अंधश्रद्धा आहे? होय!

अंधश्रद्धा म्हणजे नेमकं काय? तर अंधश्रद्धा या अज्ञानाचा, अगतिकतेचा भाग असतात. सृष्टीतील घडामोडींचे नियम ज्ञात झालेले नसतात, समाजव्यवस्था जन्मसिद्ध विषमतेवर आधारलेली असते आणि ही परिस्थिती दूर करण्यासाठी विज्ञानाचा व अद्ययावत कालोचित मूल्यभावांचा आधार घेतला जात नाही, तेव्हा अंधश्रद्धा निर्माण होतात आणि बळावतात. अंधश्रद्धा माणसाला दुबळा आणि अगतिक बनवतात. त्याची चिकित्सक बुद्धी आणि विवेकशक्ती नष्ट करतात. हळूहळू माणूस मानसिक गुलामगिरित अडकत जातो. अन्य प्राण्यांपेक्षा माणूस शारीरिकदृष्ट्या दुबळा आहे. तरीही, अन्य प्राण्यांना न साधलेली भौतिक प्रगती त्याने साध्य केली आहे, ती केवळ त्याच्या बुद्धिच्या आणि चिकित्सक वृत्तीच्या जोरावर! माणूस अंधश्रद्ध आणि अवैज्ञानिक झाला तर एकूणच समाजाच्या प्रगतीचा ओघच खुंटेल.

M.V.P. ... Mahavidyalaya Estd.1985 Islampur Dist. Sangli

Date: / /

आजपर्यंतच्या मानवी इतिहासात असे लक्षात आलेले आहे की, वैज्ञानिक जाणिवांचा विकास हेच मानवाच्या प्रगतीचे सूत्र आहे. प्रत्येक घटनेमागे कारण असते आणि ते केवळ माणसाच्याच बुद्धीला समजू शकते. सर्वच घटनांमागील कारणं आज समजली नसली तरी ती जेव्हा केव्हा समजतील त्या पद्धतींचाही उलगडा त्या त्या वेळी होत जातो. हेच ते सूत्र आहे.

विज्ञान अनुभवावर आधारित आहे तसेच ते अनुमानालाही महत्त्व देते. एका उदाहरणाने हे स्पष्ट करता येईल. 'इलेक्ट्रॉन' हा दिसत नाही पण त्याचे अस्तित्व वैज्ञानिक मानतात. ते कसे? इलेक्ट्रॉन्सच्या गतीचे परिणाम आपल्याला दृश्य स्वरूपात पहाता येतात. टेलिव्हिजनच्या पडद्यावर इलेक्ट्रॉन्सचा नाच चालू असतो. त्याचा परिणाम म्हणून पडद्यावर चित्र उमटते. अणुच्या अंतरंगातील इलेक्ट्रॉन, प्रोटान्स वा न्यूट्रान्स दिसत नाहीत पण त्यांचे अस्तित्व अप्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध होते. विज्ञानात अदृश्याचे अस्तित्व गृहीत धरतात. त्यांच्या वर्तणुकीचे काही सिद्धांत मांडले जातात. त्यातून अनुमान काढले जाते. अखेरीस तपासण्याजोगा परिणाम मिळविला जातो. विज्ञान विश्वावर आधारीत आहे. बटण दाबले की दिवा लागतो हा विश्वास म्हणजे विज्ञान. विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आपला विश्वास असूनही आपण आज अंधश्रद्धेच्याही तितकेच आहारी गेलो आहोत.

आज आपण वर्तमानपत्रात असे काही अंधश्रद्धेचे परिणाम वाचतो, ते वाचून आपल्याला सुचेनासे होते. मधल्या काही महिन्यांत मी ही असे काही प्रकार वर्तमान पत्रात वाचले, त्यांना वाचून मलाही धक्का बसला. उदा... 'कुटुंबावर आलेली रोगराई टाळण्यासाठी एका १८ वर्षीय मुलीचा बळी.' 'उपचाराच्या नावाखाली बाबाचे दुराचार.' 'बाबाने हजारो रुपयांनी फसवले.' या बातम्या मी वाचल्या. अनेक लोकांनी वाचल्या असतील तरीसुद्धा

आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. अंधश्रध्दा हा आपल्या आचा-र विचारांना लागलेला एक भयानक रोग आहे. अंधश्रध्देच्या नावाखाली होणाऱ्या हत्या, फसवणूक, बळी या आजच्या २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या युगात न शोभणाऱ्या घटना आहेत.

'ज्ञान नाही, विद्या नाही
ते घेणेची गोडी नाही,
बुध्दी असूनही चालत नाही
तयास मानव म्हणावे का?'

असे थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले यांनी म्हटले आहे. खरंच! अशा लोकांना मानव म्हणून काय उपयोग? आपण जरा थोडे मागे वळून पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, पूर्वीपासूनच लोकांच्या मनात अंधश्रध्दा अगदी ठासून भरली आहे.

भारतीय माणूस हा मूळातच दैववादी आहे. कोणत्याही कार्याच्या यशाला- अपयशाला देव कारणीभूत असतो, अशी त्याची ठाम समजूत आहे. त्यामुळे एखादे अघटीत घडले तर तो दैवावर ढकलतो पण त्याची चिकित्सा मात्र करत नाही. विज्ञानाच्या एवढ्या प्रसारानंतरही लोकांची मने बदलायला तयार नाहीत वा नवीन बदल स्वीकारायला तयार नाहीत. मांजर आडवे जाणे, घुबडाचे दर्शन अपशकुनी ठरणे, कावळा शिवणे या घटनांनासुध्दा काही अर्थ नाही.

आपण आता माहिती तंत्रज्ञानाच्या २१ व्या शतकात जगत आहोत, जिथे कोणतीही गोष्ट वैज्ञानिक कसोटीवर तपासून पाहिली जाते. तिथेही अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा पाहावयास मिळतात. आजही आपण गाडी घेतली वा एखादी यांत्रिक वस्तू घेतली तर तिही घरात घेण्यापूर्वी आपण पूजा करतो. आता याला कोणती अंधश्रध्दा म्हणावी? अंधश्रध्दा निर्मूलनासाठी शासनाने विविध कायदे केले आहेत, तसंच लोकांमध्ये विज्ञाननिष्ठा रुजविण्यासाठी विविध माध्यमातून जसे दूरदर्शन, दूरध्वनी, वर्तमानपत्रातून

M.V.P. Kanya Mahavidyalaya Estd.1985 Islampur Dist. Sangli



शासन प्रयत्न करत आहे. परंतु सरकारला त्यामध्ये अपयश आलेले आहे. संस्थात्मक पातळीवरही अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संस्था जनतेचे जनजागरण करत आहे. त्यासाठी त्यांनी अंधश्रद्धा मानणाऱ्यांना आव्हानदेखील केलेले आहे. श्याम मानव डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विशेष प्रयत्नाने नुकताच महाराष्ट्र शासनाने कायदा संमत केला. त्यामध्ये "अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तिला कमीत-कमी सहा महिन्याची शिक्षा व दंड याचे प्रावधान केले आहे. परंतु शासनाने कितीही कायदे केले तरी लोक जोपर्यंत जागृत होत नाहीत, अंधश्रद्धेला संघटितपणे विरोध करत नाही तोपर्यंत अंधश्रद्धा निर्मूलन पूर्णत: होणे शक्य नाही. गावागावांतून लोकांना संघटित करून त्यांना लोकजागृतीसाठी प्रयत्न करायला लावू आणि विज्ञानाचे महत्त्व पटवून देऊ.

अंधश्रद्धा हाच समाजाला लागलेला एक शाप आहे आणि शापातून मुक्त होण्यासाठी आपणाला विज्ञानाची कास धरावी लागेल.

ऐसे कैसे झाले भोंदू?।
कर्म करुनि म्हणती साधू ॥
अंगा लावूनिया राख।
डोळे झाकून करिती पाप ॥
दावुनि वैराग्याची कळा।
भोगी विषयाच्या सोहळा ॥
तुका म्हणे सांगो किती।
जळो तयांची संगती ॥

या ओळींचा अर्थ समजून घेऊन आपण विज्ञानाच्या - तंत्रज्ञानाच्या दिशेने चालले पाहिजे.

...

IKON Page No.
Date

नाव : अँकिता भास्कर सपकाळ
पत्ता : आंझर्डे,
वर्ग : B.Com III
मो.नं : 9322060891
विषय : संतांचे अंधश्रध्दा निर्मुलन कार्य

# संतांचे अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्य

गाडगे महाराजांना संत का म्हटलं गेलं हेच कोडे आहे. कारण ज्यांना आपण संत म्हणतो, त्या संतांसारखी एखादीही कृती गाडगेबाबांनी केली नाही. आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसा आपण बाबा म्हणतो. या अर्थाने खेडुतांनी, गोरगरिबांनी त्यांना बाबा म्हटलं आणि ते त्यांनी सहर्ष स्विकारले असावे पण महाराज ? हे काय प्रकरण आहे ? कुणी आपल्या सोयीसाठी त्यांना महाराज बनविले ? कारण त्यांनी स्वतःच अनेक वेळा सांगितलं आहे 'मी कोणाच्या गुरु नाही अन् माझे कोणी शिष्यही नाहीत'. आपल्या भोवतीच्या सामाजिक दुःस्थितीचे अवलोकन करीत, त्यातुन मार्ग शोधत गाडगेबाबांचे लोकोत्तर व ऐहवादी तत्वज्ञान आकारले आहे. हे कोणी लक्षात घेत नाही. गो.नी. दांडेकरांच्या चरित्राचे पुनर्मुल्यांकन व्हावे.

गो.नी. दांडेकरांनी आपल्या 'खास' रसाळ शैलीत गाडगे महाराजांचे चरित्र लिहुन महाराष्ट्रावर मोठे उपकार केले असे बाबांचे भक्तच जाहिर वक्तव्यातुन सांगतात. तेव्हा त्यांची कीव येते. गाडगेबाबांना गृहत्याग केल्यानंतर एक सत्पुरुष भेटला व त्यांनी अनुग्रह केल्याने गाडगे महाराज 'महाराज' बनले हा दांडेकरांचा शोध त्यांच्या कामाची प्रेरणाच विकृत बनवितो. याकडे कोणी कसं लक्ष देत नाही? गाडगे महाराजांनी स्वतः कधीही असं कुणी भेटल्याचे सांगितले नाही. उलट पायाला स्पर्श करणाऱ्या भाविकांना त्यांनी वारंवार काठीने बदडले आहे.

आपल्या भोवतीच्या प्रचंड आर्थिक व सामाजिक शोषणाच्या दर्शनातून हे प्रतिक्रियात्मक व्यक्तिमत्त्व कसं उभं झालं हे दाखवणे ज्यांना समाजाची नीतिप्रणित चौकट कायम ठेवायची आहे त्यांना अडचणीचे वाटते. म्हणुन मग कुण्यातरी साधुबुवाच्या

अनुग्रह होऊन गाडगेबाबा कार्यरत झाले असे सांगणे त्यांच्या दृष्टीने सोईचे असते. गाडगेबाबांनी किर्तनाद्वारे प्रबोधन केले यामुळेही त्यांना महाराज बनवणे सोयीचे गेले. पण त्यांच्या किर्तनपद्धतीकडे, वारकरी किर्तनपद्धती, राष्ट्रीय किर्तन पद्धती यामध्ये त्यांच्या किर्तनाचा समावेश करता येत नाही. त्यांचे किर्तन म्हणजे एक तमिळ्च्या कर्त्या सुधारकाचे मुक्त व प्रगड चिंतन आहे. गाडगेबाबा निरक्षर होते. या निरक्षर माणसाने समाजाचे उद्बोधन व त्यातही ग्रामीणांचे करताना, कोणते माध्यम निवडावे? व्याख्यान? कोण आले असते त्यांच्या व्याख्यानाला? कुठलीही कृती करायला घाबरणारा व आत्ममग्न असलेला मध्यमवर्ग आणि खेडुत तर व्याख्यान म्हटल्याबरोबर दोन हात दूर राहतो. आपले तमिळ्चे विचार मांडण्यासाठी लोक जमविणाऱ्या किर्तनाचा आधार घेतल्याशिवाय त्यांना पर्याय नव्हता. त्यांनी आपल्या सोयीची किर्तनपद्धती बनवली. पण तीच प्रबोधनाच्या दृष्टीने परिणामकारक ठरली, आचार्य अत्रे यांनी म्हटले आहे "सिंहाला पहावे वनात आणि गाडगेबाबांना पहावे किर्तनात!"

मूर्तिपूजेचा निषेध;

दगडधोंड्याची पुजा करण्यात काळाचा व पैशाचा व्यय करु नका, त्यांच्यापुढे बकरा व कोंबडा मारु नका, तीर्थक्षेत्राला जाऊ नका, गंगस्नानाने पापे जातात असे म्हणणे हा धर्माचा शुद्ध काळाबाजार आहे, असे त्यांनी प्रत्येक किर्तनात सांगितले. श्रोत्यांशी ते प्रत्यक्ष संबंध साधित. ते विचारीत "देवा किती?" श्रोते म्हणत 'एक'. तुमच्या गावी खंडोबा आहे का? आहे ना मग देवा किती झाले, 'दोन' असे वाढवीत ते देवांची संख्या दहाबारावर न्यायचे. श्रोत्यांच्या डोक्यात आपोआप प्रकाश पडु लागायचा. पुढे ते म्हणायचे "देवा सोन्याचा केला तर त्याचा बाप सोन्याचा झाला, लोखंडाचा केला तर त्याचा बाप लोहार झाला. या दगडधोंड्याच्या नादी लागु नका. आणि वेळ बर्बाद करु नका. असे ते आवर्जुन सांगत देवावर त्यांच्या मुर्तिपुजेवर हल्ला चढवितांना ते तुकाराम व कबीर यांची पुजा घेत व आपले म्हणणे सामान्य खेडुतांच्या गळी उतरवत

एखाद्या गावी ते किर्तन लावीत. खेडुतांना विचारित "तीर्थाला गेलात नाईत श्रोते: होय, बाबा बाबा: बोलला काई

तुमचा देव? ब्रोत; नाई. बाबा; इतक्या दुरुन गेले तं जेवले-गिवले का, असं काईच नाई विचारलं? वारे! तुमचा देव?

देवांची व मुर्तिपुजेची गाडगेबाबांनी अतिशय त्वेषाने टिंगल केलेली दिसते. खेड्यापाड्यामध्ये दगड- धोंड्याला शेंदुर माखून देव बनविले जात. अशा शेंदुरमाख्याला देवांना त्यांनी नदीत उचलुन फेकले. केवढे हे क्रांतिकारकत्व! एका कितनात ते म्हणतात, 'कसा बापा तुमचा देव? महादेवाच्या पिंडीवर कुत्रं अभिषेक करतं तं तो 'हाडई' म्हणत नाही. यापेक्षा कोणत्या शब्दात मूर्तिपुजेवर व कर्मकांडावर हल्ला करता येईल? जगात जाती दोनच.

अस्पृश्यता केवळ कायद्याने जाणारी नसुन मतपरिवर्तनाने जाईल. हे ओळखुन अस्पृश्यतेची आपले स्पष्ट विचार त्यांनी कितनाद्वारे खेड्यापाड्यातून आणि शहरातूनही जनतेपुढे मांडले ते म्हणायचे 'जगात जाती फक्त दोनच आहेत. एक पुरुष व दुसरी स्त्री. तिसरी जातच नाही जो कोणी जात विचारत असेल तो महामुर्ख होय. कोणी जर जात विचारित असेल तर मी माणुस अहे असं सांगा. जनावरात जसं गाढव, बैल, म्हैस, कुत्रा असं ओळखता येतं. तसेच मनुष्यजातित हा महार, हा कुणबी, हा ब्राम्हण जसा हा गाढव - हा बैल असं ओळखता येतं. तसेच मनुष्यजातीत हा महार, हा कुणबी हा ब्राम्हण असं ओळखता आले असते... पुढे त्यांनी म्हटले असते. 'आपल्या देशात फक्त "शिवाशिव हा शब्द आहे शिवाशिव हा शब्द रशियात नाही. अमेरिकेत नाही चिनमध्येसुद्धा नाही. फक्त हिंदुस्तानातच आहे बाप्पा! जीभतच निर्मुलनासाठी असे प्रभावी प्रबोधन त्यांनी खेड्यापाड्यामधुन दिले.

गाडगेबाबा खेडुतांच्या मनातील अंधश्रद्धेच्या मळ जसा खरडीत होते. तसेच भोवतीचा कचराही साफ करित होते. सार्वजनिक आरोग्याचे महत्व लक्षात घेवुन ते ज्या ठिकाणी गेले त्या ठिकाणी त्यांनी रस्ते झाडले, नाल्या साफ केल्या खेड्यातले अनेक आजार, व्याधी ह्या अस्वच्छ राहणी व कुपोषण यातुन निर्माण होतात हे गाडगेबाबांनी ओळखले होते. म्हणुन त्यांनी स्वच्छतेवर भर दिला. या 'खराटाधर्माने' त्यांनी सार्वजनिक आरोग्य व श्रमप्रतिष्ठा अशा दोन साध्यांची प्राप्ती केली महात्मा गांधींनी 'चरख्यातुन स्वराज्य' दिले तसे गाडगेबाबांनी खराट्यातुन

सुराज्य सांगितले. खेड्यातील माणसे अस्वच्छ राहणीमानामुळे अनेक साथीच्या रोगांना बळी पडतात. आणि आजारी आली की मांत्रिक, देवऋषी यांचा आश्रय घेतात. हे गाडगेबाबांनी हेरले होते. आजारपणात डॉक्टरांकडे जा. अंगारे-धुपारे नवसतापास करु नका. असा कळकळीचा सल्ला खेडुतांना द्यायला ते कधी विसरले नाहित. अंगात येणे या ढोंगांच्या तर अनेक वेळा त्यांनी आपल्या किर्तनात नक्कल करित-करित निषेध केला.

इहवादी दृष्टीकोन:

गाडगेबाबांच्या चरित्रातील एक घटना अतिशय उद्बोधक आहे. महाराष्ट्रभर त्यांनी भ्रमंती केली. नासिकला ते गेले. तिथे एक पुरोहित पाण्यात उभे राहुन मंत्र म्हणत होता. त्यांची चेष्टा करण्याची इच्छा गाडगेबाबांना आली. ते नदीच्या पात्रात उतरले नदीचे पाणी ओंजळीत घेऊन ते किनाऱ्याकडे फेकु लागले. तो पुरोहित संतप्त होऊन म्हणाला. 'अरे वेड्या! हे काय करता आहेस? बाबा म्हणाले माझ्या वावराला पाणी घालतो. वावर म्हणजे शेत 'कुठे आहे तुझे शेत. 'कुठे जी वऱ्हाडात मुर्तिपुजार-पुरपाशी हापुरा आहे तथी - पुरोहित म्हणाला, 'हे पाणी इतक्या दुर कसे जाणार' बाबा म्हणाले 'तुम्ही पितृमोक्ष आमावस्येला आपापल्या पितरांना अन्न स्वर्गात पाठवता मग आम्हाला वऱ्हाडात पाणी नाई पाठवता येणार काय? अशा बुध्दीवादी, युक्तिवादाच्या विनोदाची डुंगरे बाबांच्या चरित्रात अनेक ठिकाणी बिनाहताना दिसतात. गो.नी. दांडेकरांसारख्या चरित्रकांना ती का दिसू नयेत.

सत्यनारायणासारख्या पोथ्यांचाही गाडगेबाबांनी कडाडुन निषेध केला आहे. ते म्हणतात, साधुवाण्यांनी सव्वा रुपयाचा प्रसाद वाटला व पोथी वाचली तर कलावती का लिलावतीची बोट पाण्यात तरंगली 'असं असेल तं मंग सारे मटकी सैन्यात पाठवा. शत्रुंच्या बंदुकिच्या गोळ्या परतावा म्हणा सत्यनारायणाची पोथी वाचुन असे परखड विचार एका निरक्षर माणसाने मांडावे याचे कौतुक वाटते.

शिक्षणावाचून माणसे म्हणजे धोंडा:

भारतातल्या शेख दारिद्र्याचा बोध घेताना त्यांच्या मनात आले. शिक्षणाशिवाय आमचा उद्धार नाही. या संबंधि बोलताना

IKON Page No.
Date

त्यांनी अनेकवेळा म्हटले आहे 'हे लोक का गरिबीत? त्याला इच्छा नसील त्याला खाशाल्याच्या बैल म्हटले तरी चालेल आता चरी सुधारा. मुलाला शिक्षण दया. उव्हायला पाहुचार करु नका. पण मुलाला शाळेत घातल्याशिवाय राहु नका.

सामाजिक तळमळीतुन त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. महाराष्ट्रामध्ये शिक्षणसंस्था काढल्या. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक सामाजिक कार्याला सक्रिय पाठिंबा दिला स्वःत निरक्षर असलेल्या या माणसाने महाराष्ट्रातील खेडुलांच्या हाती 'लेखणी' दिली. कशासाठी? त्यांना वाटले होते. शिक्षणानंतर समाजातील सामाजिक, आर्थिक विषमता कमी होईल. देव व देवांच्या नावाने चालणारे कर्मकांड कमी होईल. जातिभेद व पशुहत्या थांबेल पण काय झाले? शिकलेल्या आजच्या माणसांनी या सर्व गोष्टींना खतपाणी घातले आहे जी गोष्ट निरक्षर माणसाला समजली ती आम्हा सुशिक्षितांना समजु नये हे केवढे आश्चर्य.

महाराष्ट्रात एका निरक्षर माणसाने आपल्या सर्व ताकदीनिशी अंधश्रध्देवर आघात केले आणि 'बुध्दिवाद' हा शब्दही माहित नसुन बुध्दीवादी विचाराला लोन आपल्या परिने पोहचवण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट समविचारी माणसांनी कृतज्ञतेने स्मरणात ठेवावी.

देवासाठी पैसा खर्च करु नका
तोच पैसा शिक्षणाला दया
मंदिराची भर करु नका. जो
विदयार्थी हुशार आहे तो पैसा
त्याला दया. धर्मकृत्य
करण्यासाठी नाही. विद्या
देण्यासाठी पैसा खर्च करा.

# * मराठी निबंध लेखन स्पर्धा *

Page No.
Date


स्पर्धकाचे नाव :- कु. मृणाली जयवंत मोहिते
वर्ग :- B.A.I
विषय :- दुष्ट प्रथा व अंधश्रद्धा निर्मूलनातील समाजसुधारकांचे कार्य
पत्ता :- मु. पो. कामेरी. ता - वाळवा जि. - सांगली ४१५ ४०३
मोबाईल क्र. :- 9067117419


## * दुष्ट प्रथा व अंधश्रद्धा निर्मूलनातील समाजसुधारकांचे कार्य *

'अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैवं च नैव
अजापुत्रो बलिर्दद्यात देवो दुर्बल घातक: |'

देवाला घोडा बळी लागत नाही, हत्ती नाही आणि वाघ तर नाहीच नाही. अजापुत्र म्हणजे बोकड बळी लागते. देवसुद्धा दुर्बलांचा घातकी आहे. हे सुभाषित म्हणजे देशात पूर्वापार चालत आलेल्या अंधश्रद्धेची साक्ष आहे. प्राचीन काळी समाज अतिशय अडाणी, निरक्षर होता. जातिभेदाच्या भावना पराकोटीला पोहोचल्या होत्या. मने अतिशय संकुचित होती. त्यामुळे अंधश्रद्धांनी त्यांच्या मनात कायमचे घर केले होते.

शिक्षणाने माणूस सुसंस्कृत बनतो, तर अज्ञानाने माणूस अंधश्रद्धाळू! अज्ञान, अडाणीपणा आणि कष्टाशिवाय मोठे होण्याची हाव यामुळे समाजात अंधश्रद्धा फोफावत आहे. म्हणूनच म्हटले जाते 'माणसाने श्रद्धाळू जरूर असावे पण अंधानुकरण करु नये.' अंधश्रद्धा समाजाला एक शाप आहे. पूर्वी समाज अज्ञान, अंधश्रद्धा, हुंडा, अनिष्ट प्रथा, केशवपन, बालविवाह यासारख्या भयानक विकृतींनी ग्रासलेला होता. मांजर आडवे जाणे, घुबडाचे ओरडणे, पाल चुकचुकणे वगैरे गोष्टी अशुभ मानल्या जाई.

समाजात फलज्योतिष, पुनर्जन्म, प्लँचेट, करणी, संमोहन, भूतबाधा, पुत्रप्राप्ती इत्यादी मार्गांनी आणि कारणांनी अंधश्रद्धा ठाण मांडून बसली होती. गुप्तधन मिळविण्यासाठी निरपराध बालकांना बळी देण्याची प्रथा आजही चालूच आहे. स्त्रीचा विवाह ठरवण्यासाठी 'द्याज' द्यावे लागते. द्याज देण्यासाठी टाळाटाळ केल्यास किंवा कमी दिल्यास एक तर लग्न मोडते किंवा लग्नानंतर आयुष्यभर सासूच्या टोचण्या खाव्या लागतात. 'हुंडा' ही एक अनिष्ट व दुष्ट प्रथा फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे.

'हुंडा घेणे' या प्रथेवर कायद्याने बंदी असूनही कायदा धाब्यावर बसवून राजरोसपणे हुंडा घेतला जातो. जिथे कायदा आड येतो, तिथे हुंड्याचे स्वरूप बदलते इतकेच! लहान मूल आजारी पडले तर त्याला प्रथम डॉक्टरांकडे न नेता मंत्र-तंत्र, गंडे-दोरे, अंगारे-धुपारे, लिंबू-नारळाचे उतारे यासारखे उपाय केले जात. स्त्रियांना शिक्षण घेणे महापाप मानले जाई. अशा अनेक दुष्ट प्रथा पूर्वी अस्तित्वात होत्या. प्राचीन काळात समुद्र ओलांडणे हे सुद्धा पाप मानले जात होते. या अंधश्रद्धांमुळे भारताचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात फार नुकसान झाले आहे.

'शेंदूर माखोनिया धोंडा ।
पाया पडती पोरे रांडा ॥
सोडोनिया खऱ्या देवा ।
करी म्हसोबाची सेवा ॥'

संत तुकारामांनी अज्ञान, अंधश्रद्धेत गुरफटलेल्या समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालून प्रकाशाची नवी वाट दाखवण्यासाठी आपले सारे आयुष्य वेचले. फुले दाम्पत्याने बालविवाहाविरुद्ध आवाज उठविला. बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. विधवांना आधार दिला. महात्मा फुले यांनी केशवपनाची अनिष्ट प्रथा बंद व्हावी म्हणून न्हाव्यांचा संप घडवून आणला. एका विधवेच्या पोटी जन्मलेल्या 'यशवंत' नावाच्या मुलाला दत्तक घेऊन पुरोगामी विचारांचे प्रतिनिधित्व कृतीतून दाखवून दिले.

ज्या काळी स्त्रियांनी शिक्षण घेणे महापाप मानले जाई, त्याच काळात महात्मा फुलेंनी वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी म्हणजे सन १८४८ साली पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. तत्कालीन सनातनी ब्राह्मणांनी फुल्यांना मोठा विरोध केला. शिक्षणाचे पवित्र कार्य करण्यास निघालेल्या सावित्रीबाईंच्या अंगावर लोकांनी शेण, चिखल, विष्ठा टाकली. पण सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. त्यांनी अनेक विधवांचे पुनर्विवाह घडवून आणले आणि अस्पृश्यांच्या मुलींनाही शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. या दाम्पत्याने स्त्री-जातीला 'निर्भय व्हा, साक्षर व्हा' असा संदेश दिला.

पूर्वी विहिरीला, आडाला पाणी लागावे म्हणून लेकुरवाळ्या स्त्रीला बळी दिले जात असे. सर्वच भयानक, क्रूर! अजूनही मूल होत नसेल तर देवांना नवस बोलले जातात व पहिले मूल (मुलगा किंवा मुलगी कोणीही असो) देवाला सोडले जाते. त्या मुलांचे आयुष्यभर काय-काय हाल व छळ होतात ते परमेश्वरच जाणे.

"नवसे पुत्र होती, तरी का करणे लागे पती"

पुत्र नवस करून होत असेल तर पती करण्याची गरजच काय? असा खडा सवाल करून तुकारामांनी अंधश्रद्धाळू लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. गाढवाच्या तोंडात काशीची गंगा ओतणाऱ्या एकनाथांनीही अंधश्रद्धेवर प्रहार केला. नरेंद्र दाभोलकर यांनी अघोरी सामाजिक प्रथा व अंधश्रद्धा निर्मूलनासाठी इ.स. १९८९ साली समविचारी कार्यकर्त्यांना जमवून 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' ही संघटना स्थापन केली. ते स्वतः या संघटनेचे संस्थापक व कार्याध्यक्ष होते.

राजा राममोहन रॉय यांनी सतीच्या अनिष्ट व अमानुष प्रथेविरुद्ध प्रचाराची जोरदार आघाडी उभारली. 'सतीची चाल धर्मविरोधी आहे', असे त्यांनी अनेक धर्मग्रंथांचा आधार घेऊन प्रतिपादन केले. त्यांनी केलेल्या लोकजागृतीमुळेच तत्कालीन गव्हर्नर जनरल 'लॉर्ड विल्यम बेंटिक' यांनी इ.स. १८२९ मध्ये सतीची चाल बंद करण्यासंबंधीचा कायदा संमत केला. बालविवाह, बालहत्या, केशवपन, जातिभेद, बहुपत्नीत्व यांसारख्या प्रथांनाही त्यांनी विरोध केला. त्यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले आणि समाजात विधवांना न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केले.

पुरुष आणि स्त्री ही जीवनरूपी रथाची दोन चाके आहेत. यातील एखादे चाक जरी कमकुवत लागले तरी जीवरूपी रथ अडखळतो. म्हणूनच समाजात समता आवश्यक आहे. चला तर मग समाजसुधारकांच्या महान कार्याचा आदर करूया आणि दुष्ट प्रथा व अंधश्रद्धांना दूर सारूयात!

*—*—*

IKON Page No.
Date

# निबंधाचा विषय

## अंधश्रध्दा, बुवाबाजी व चमत्कार विरोधी कायदा

विद्यार्थीचे नाव : मानसी दिपक होगले

वर्ग : B.A III

पत्ता : मु.पो. गोटखिंडी ता. वाळवा जि. सांगली

मोबाईल नं : 9561245090

# चमत्कार आणि जादूटोणा विरोधी कायदा



बुवाबाजीविरुद्धची लढाई ही महाराष्ट्र अंनिसमधील एक मोठे कुतूहल व आकर्षण राहिलेले आहे बुवाबाजी तशी अनेक प्रकारची चालू असे. कथित बाबा - बुवा, स्वामी - महाराज मांत्रिक, देवऋषी, संत महंत अशी अनेक नावे धारण करून स्वतःच्या दैवी शक्तीचा, दैवी चमत्काराचा कधी उघड तर कधी छुप्या पद्धतीने प्रसार करत जनतेची दिशाभूल व फसवणूक करीत धंदा करीत असतात. या प्रत्येकाचे मंत्र - तंत्र गिऱ्हाईक, कार्यपद्धती वेगवेगळी असते यापैकी चमत्काराशी जोडलेली बुवाबाजी ही एक लोकांवर भुरळ पाडणारी आहे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चळवळीमुळे व बुवाबाजीविरुद्धच्या संघर्षामुळे; तसेच जादूटोणाविरोधी कायद्यामुळे महाराष्ट्रभर चमत्काराबद्दल मोठी जनजागृती झाली याचा परिणाम महाराष्ट्रात चमत्काराचा दावा करून बुवाबाजी करणारे बुवा - बाबा आता तुलनेने कमी झाले आहेत.

तथापि, 21 सप्टेंबर 1995 रोजी गणपती दुग्धप्राशन घटनेमुळे आपल्या देशाच्या लोकांच्या, चमत्काराला शरण जाणाऱ्या मानसिकतेची चुणूक दाखवून गेली यामुळे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती हा दिवस 'चमत्कार सत्यशोधक दिन म्हणून पाळते चमत्कारावर विश्वास ठेवणारी मानसिकता अधिक घातक असते कारण त्यातून स्वतःच्या कर्तृत्वावरचा विश्वास गमावून बसतो. चमत्कारावर विश्वास ठेवणे म्हणजे विज्ञानाचा पायाच नाकारण्याचे सारखे आहे. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोनाचे मूल्य नाकारणे होय.

चमत्कारांबद्दल अब्राहम कोवूर म्हणतात, 'जगात कोणीही चमत्कार करू शकत नाही. चमत्कार करण्याचा दावा करणारे बदमाष असतात. चमत्कारावर विश्वास ठेवणारे मूर्ख असतात. चमत्काराला विरोध न करणारे भ्याड असतात.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने सुरुवातीपासून अशा सर्वदूर पसरलेल्या बुवाबाजीपासून लोकांची फसवणूक व शोषण होऊ नये, तसेच अज्ञानावर आधारलेल्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने; तसेच समाजातील सर्वसामान्यांचे शोषण व फसवणूक होण्यापासून रोखण्यासाठी कायदा करण्याची मागणी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी मागणी करून जाहिरनामा प्रसिद्ध केला होता. पुढे 1995 साली शिवसेना भाजप युतीचे सरकार सत्तेवर असताना आमदार पी.जी. दस्तुरकर यांनी कायद्याबाबतचा अशासकीय ठराव 7 जुलै 1995 ला विधानपरीषदेमध्ये मांडला. तो 28 विरूध्द 7 मतांनी मंजूरही झाला; परंतू पुढे काहीही झाले नाही. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक - कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली निरंतर, सतत कायद्याचा पाठपुरावा व त्यासंबंधी अनेक वेळा विविध प्रकारची आंदोलने, धरणे, मोर्चे असा संघर्ष चालूच ठेवला. शेवटी डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या खुनानंतर महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील दबावाखाली 18 वर्षाच्या प्रदीर्घ संघर्षानंतर कायदा मंजूर झाला; परंतू त्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा बळी गेला. या कायद्याच्या मसुद्यामध्ये अनेक तरतुदी सुरुवातीला होत्या; परंतु नंतर शेवटी बऱ्याच तरतुदी कमी केल्या गेल्या. शेवटी कायदा होणे, हे महत्वाचे होते.

या कायद्याचे नाव 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, 2013' असे आहे. या कायद्यास 'जादूटोणाविरोधी' कायदा असेही म्हणतात. हा कायदा झाल्यानंतर चमत्काराचे दावे करणारे बाबा, बुवा आज जवळजवळ बंद झाले आहेत. कायदा होण्यापूर्वी काही

बाबा - बुवा असे चमत्काराचे दावे करीत होते; परंतु अंनिसने त्यांच्या दाव्यांचा भांडाफोड करून, तसेच त्यांना चमत्कार सिद्ध करण्याचे आव्हान देऊन त्यांचे दावे फोल ठरविलेले आहेत. आजही अंनिसने चमत्कार सिद्ध करणाऱ्यास लाखांचे जाहीर आवाहन केले आहे परंतु आजपर्यंत 25 कोणीही चमत्काराचे आव्हान स्वीकारायला तयार नाहीत. त्यामुळे आज चमत्काराच्या आधारे बुवाबाजी करणारे थांबले आहेत. आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारे वेगवेगळे फंडे वापरून बुवाबाजीचे वेगळे प्रकार मात्र आजही चालू आहेत. जादूटोणाविरोधी कायद्यामध्ये एकूण 12 तरतुदी आहेत. जादूटोणाविरोधी कायद्यामध्ये चमत्कारासंबंधी एक तरतुद आहे. ती अनुसूची 2 अंतर्गत अशी आहे की, एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्काराचा प्रयोग प्रदर्शित करून त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे आणि अशा तथाकथित चमत्कारांचा प्रसार व प्रचार करून लोकांना फसविणे, ठकविणे आणि त्यांच्यावर दहशत बसविणे, गुन्हा आहे. त्यामध्ये विशेष अलौकिक शक्तीचा किंवा दैवी शक्तीचा दावा करून फसवणारे बाबा - बुवा किंवा कोणीही असा दावा करीत असतील, तर त्यांच्यावर या कायद्याखाली गुन्हा दाखल होऊ शकतो. सिद्ध झाल्यास सजाही होऊ शकते. या कायद्याचा प्रभावीपणे वापर करून चमत्कारांच्या घटना आपण बंद करू शकतो.

## अंधश्रद्धा आणि जादूटोणाविरोधी कायदा

महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी व दुष्कर्मी प्रथा आणि काळा जादू अधिनियम 2013" हा महाराष्ट्र राज्यातील एक गुन्हेगारी कायदा आहे, मुळात हा कायदा 2003 मध्ये जादूटोणाविरोधी कार्यकर्ते आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) चे संस्थापक नरेंद्र दाभोलकर [1945 - 2013] यांनी तयार केलेला आहे. हा कायदा जादूटोणा, नरबळी, आजार बरे करण्यासाठी

काळ्या जादूचा वापर आणि अशाच प्रकारच्या अनेक कृती ज्यामुळे लोकांच्या अंधश्रद्धेचे शोषण होऊ शकेल त्यांना गुन्हेगारी अपराध ठरविलो वर्षानुवर्षे बंदी घातलेल्या क्रियांची संख्या सतत कमी केली जात होती. दाभोलकर यांच्या हत्येनंतर, 26 ऑगस्ट 2013 रोजी हे विधेयक मांडण्यात आले. आणि नागपूरच्या महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात डिसेंबर 2013 मध्ये ते औपचारिकपणे मांडले गेले.

## आढावा →

ह्याच्या विधेयकात 12 कलमें आहेत जी केवळ पुढील कृतींवर गुन्हे दाखल करतात.

1 कथितपणे ताब्यात घेतलेल्या व्यक्तीकडून भूत काढून टाकण्याच्या बहाण्याने प्राणघातक अत्याचार, जबरदस्तीने मानवी शरीरात मिसळणे, लैंगिक अत्याचार, ब्रांडिंग इ...

2 चमत्कार करण्याच्या क्षमतेचा दावा करणे आणि प्रसारित करणे आणि अशा प्रकारे लोकांना फसवणे किंवा भयभीत करणे

3 एखादया व्यक्तीकडे अलौकिक शक्ती आहेत आणि लोक त्यांच्या आज्ञा पाळण्यास भाग पाडतात अशी भावना निर्माण करणे.

4 एखादया व्यक्तीवर काळ्या जादूचा अभ्यास केल्याचा आरोप करणे, त्याला नग्न करणे आणि त्या व्यक्तीच्या क्रियाकलापांमध्ये अडथळा आणणे.

5 एखादया व्यक्तीवर काळा जादू करण्याचा किंवा सैतानचा अवतार असल्याचा आरोप, त्याच्यावर / तिच्यावर रोग किंवा दुर्दैवी कारणीभूत असल्याचा आरोप करणे आणि त्या व्यक्तीला त्रास देणे.

6 बोटांनी शस्त्रक्रिया करण्याचा दावा [मानसिक शस्त्रक्रिया] आणि, जन्म न घेतलेल्या गर्भातील लिंग बदलण्याचा दावा.

Date / /

## इतिहास

2003 चे मूळ विधेयक नरेंद्र दाभोलकर यांनी तयार केले होते. जुलै 2003 मध्ये राज्य सरकारकडून या आराखड्यास मान्यता देण्यात आली. हे विधेयक केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी ऑगस्ट 2003 मध्ये पाठवले होते. तथापि, अंधश्रद्धा काळा जादू, जादू, जादूटोणा इ.. अशीची कमकुवत व्याख्या असल्याबद्दल यावर टीका केली गेली. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मांडले गेले नाही. विवेकवादी श्याम मानव यांनी हे विधेयक सुधारित व पुनर्निर्देशित केले हा मसुदा "महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी व कुकर्मी प्रथा आणि काळा जादू 2013" म्हणून सादर करण्यात आले.

## जादूटोणाविरोधी कायदा काय आहे?

विवेकवादी विचारवंत नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतर महाराष्ट्र सरकारने 2013 साली तडकाफडकी जादूटोणा, अघोरी कृती, नरबळी आणि काळी जादू याच्या विरोधात कायदा संमत केला.

- या आधी हा कायदा पास व्हावा म्हणून दाभोलकरांनी 2010 पासून अनेक प्रयत्न केले होते. याच कायद्याचा मसुदा त्यांच्याच अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संस्थेने तयार केलेला होता.

अनेक उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी हा कायदा हिंदू-विरोधी आहे असं म्हणत याला विरोध केला होता. संसदेच्या सलग सात अधिवेशनामध्ये यासंबंधी बिल मांडलं गेलं होतं पण दाभोलकरांच्या मृत्यूआधी हा कायदा पास होऊ शकला नाही.




## भानामतीमध्ये वापरली जाणारी काळी बाहुली.

सध्या या कायद्यात 12 कलम आहेत. यात मारहाण, छळ, जबरदस्तीने मानवी विष्ठा खायला लावणं, भूत उतरवण्याच्या नावाखाली लैंगिक शोषण करणं, चमत्कार घडवण्याचा दावा करणं, काळी जादू केल्याचा आरोप करणं, काळी जादू केली म्हणून एखाद्याला बहिष्कृत करणं, जादूने एखाद्याचा आजार बरा करण्याचा दावा करणं अशा गुन्ह्यांसाठी शिक्षेची तरतुद आहे.

नको जाऊन भावना आहारी
कुठे अंधश्रद्धाने भले होई
कापून कोंबड्या येथे रे
कोणता देव प्रसन्न होई.......

शस्त्र धूप अंगाऱ्याने येथे
कुठे कोणता आजार बरा झाला?
मनाच्या अशा कल्पना तू रे
जो - तो मग नाहक बळी झाला....

श्रद्धा जीवन घडवून जाई
अंधश्रद्धा घात करून पाही.....
सावर तू मानवा! मग तुला!
देव ही येथे भेटून पाही......

धन्यवाद

नाव = सायली रानेंद्र सोरटे
वर्ग = B.A. III
पत्ता = निनाई नगर , इस्लामपूर
विषय = संतांचे अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य
नंबर = 9145615852

## संतांचे अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य

आजचे जग हे विज्ञान युग समजले जाते. आजच्या जगामध्ये विज्ञानाच्या जोरावर अतोनात प्रगती झालेली आहे. नवनवीन शोध लावून मानवाने आपले जीवन सोयीस्कर आणि सुलभ करून घेतले आहे. तरीसुध्दा आजच्या या आधुनिक जगामध्ये काही भागांमध्ये अंधश्रध्देचे साम्राज्य पसरलेले आहे. आजूनही लंगोटी लावणाऱ्या आदिवासींपासून ते महानगरी मुंबईच्या गगनचुंबी इमारतीतून आंतरराष्ट्रीय व्यापार करणाऱ्या उदयोगपतीपर्यंत आणि नुकतीच समज येऊ लागलेल्या नऊ दहा वर्षांच्या बालकापासून ७० च्या परिपक्व, प्रौढ, वयस्कर व्यक्ती ही अंधश्रध्देला बळी पडतात. अंधश्रध्दा निर्मूलन करणे काळाची गरज असते.

अंधश्रध्दा म्हणजेच आंधळा विश्वास. एखादया गोष्टीवर किंवा चाली रुढी आणि परंपरा वर केलेला आंधळा विश्वास होय. चुकीच्या पायावर उभी असलेली विचार सरणी म्हणजे अंधश्रध्दा होय. आणि या अंधश्रध्देला वाढवण्याचे काम खतपाणी घालण्याचे काम हे आपल्या समाजातील काही व्यक्तींकडून केले जाते. उदा. मांजर आडवे जाणे, टिटवी ओरडणे, घुबड पाहणे यांना अशुभ मानले जाते. अशा भाबडया गोष्टींवर आजही समाज विश्वास ठेवतो. व अशा गोष्टी आजही समाजात मानल्या जातात. नरबळी देणे, पशुपक्ष्यांचा बळी देणे यांसारख्या अघोरी कृत्य आपल्या समाजामध्ये

अंधश्रध्दा पसरवण्याचे काम करतात. म्हणून अंधश्रध्दा हे मानवी समाजाला लागलेला अभिशाप आहे. अंधश्रध्दाळू माणूस आपली विचारशक्ती हरवून बसलेला असतो. त्यामुळे अशा व्यक्ती खोट्या विचार साधनेला बळी पडतात. त्यामुळे त्यांचे नुकसान होते.

अंधश्रध्दा, बुवाबाजी व चमत्काराच्या विरोधात संतांनी समाजामध्ये जनजागृती केली आहे. महात्मा फुले, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य, त्यांनी आपल्या प्रबोधनातून अभंगातून, काव्यातून समाजाला जागृत केले आहे.

खरे तर महाराष्ट्रात हे सांगण्याची गरज खरच नको होती. साडेतीनशे वर्षापूर्वी तुकोबांनी परखडपणे लिहिले

ऐसे कैसे झाले भोंदू।
कर्म करोनी म्हणती साधू।।
अंगा लावूनिया राख।
डोळे झाकून करिती पाप।।
दावुन वैराग्याची कळा।
भोगी विषयाचा सोहळा।।
तुका म्हणे सांगू किती।
जळो तयांची संगती।।

दीडशे वर्षापूर्वी महात्मा फुले यांनी समाजातील बुवा बाबा, महाराजांची पैदास कशी होते, याचे मर्मग्राही विवेचन 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकात केले आहे. एखादा काय, बाबा, बुवा, मांत्रिक, भगत, संत, महंत, माताजी, योगी, भगवान यांची बाजारपेठ भरतीच्या तेजीत आहे. महात्मा फुले म्हणतात की खेड्यातले अनेक आजार, व्याधी ह्या अस्वच्छ राहणी आणि कुपोषण यांतून निर्माण होतात. खेड्यातील माणसे अस्वच्छ राहणीमुळे अनेक साथीच्या रोगांना बळी पडतात. आणि आजारी झाली की

मांत्रिक, देवऋषी, बुवा-बाबा यांच्या कडे जातात. त्यामुळे अशा लोकांचे फावते. त्यामुळे समाजामध्ये अशा लोकांचे स्थान निर्माण होते. लोक त्यांच्यावर विश्वास ठेवतात त्यांच्या आहारी जातात. बुवा-बाबा सांगतील तस वागतात, ते जे करायला सांगतील तस लोक करतात उदा. देवाला कोंबडा / कोंबडी देणे, बकरा कापणे बुवा-बाबा सांगतात असं केलं की तुम्हाला लाभ होईल, तुमची प्रगती होईल, व लोक अशा आश्वासनाला बळी पडतात व बुवा-बाबा काय सांगतात ते करतात.

बुडती हे जन देखवेना डोळा।
म्हणोनि कळवळा येतो आम्हां॥

असं महात्मा फुले म्हणतात.

शब्दात सांगायचे म्हणजे शिक्षणामुळे व्यक्तीच्या जीवनामध्ये बदल होतात असे असले तरी देखील बुद्धिहीन असणारी व्यक्तीदेखील अंधश्रद्धेला बळी पडते. एखादया बाबाने चालवलेल्या बुवाबाजीचे बिंग फोडावे तोवर आणखी दहा बाबांनी आपला जम बसवलेला असतो. बुवाबाजी विरोध मोहिमेनंतर आज ५०-६० वर्षे उलटली तरी सुद्धा बुवाबाजी जोरात का चालू आहे? कारण लोकांच्या २१ व्या शतकात देखील बुवा-बाबा, ऋषी यांच्यावर असलेला विश्वास जसे की मिरची, लिंबू घराच्या चौकटीला लावून लटकवले जाते. असं केलं की लोकांना वाटते की आपल्या घराला कोणाची नजर लागणार नाही. ताप आला की नजर / दृष्ट काढणे हे आज देखील आपल्या घरात चालत आलेल्या गोष्टी आहेत. खरंच दृष्ट काढल्याने ताप जातो का? ही आपली मानसिकता झालेली असते की आपण जर नजर काढली की आपल्याला बरं वाटतं. जर नजर काढून ताप वगैरे जात असेल तर लोकांनी डॉक्टराकडे जायचं सोडून दिलं असे घरातल्या उपाय करून आजार बरे केले असते.

बुवा-बाबा, थडगी, झाड यांच्या यात्रा किंवा

त्याच्या अक्कलेवर आधारित असतात. काही प्रासंगिक आराम मिळतो हे खरे असले तरी परंतु बहुदा त्याचे कारण संबंधित व्यक्तीला असणारा आजार मनोशारीरिक स्वरूपा-च्या असतो. अशा वेळी त्या व्यक्तीच्या अंतर्मनावर देण्यात आलेली सकारात्मक सूचना मन थेट स्वीकारते. अशा व्यक्तीनिष्ठ अनुभवाला सार्वत्रिक बनवून दैवी चमत्काराच्या भाकड कथा पसरवल्या जातात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्याचा वेध घेताना त्यांच्या धर्मचिकित्सेचा आणि धर्मांतर चळवळीची व्याप्ती प्रामुख्याने बुवाबाजी, चमत्काराचा दावा करणारे स्वामी, साक्षात्कारी असल्या-चा प्रचार करणारे महाराज, झपाटणे, भानामती, वशीकरण विद्या पुनर्जन्म इ. च्या संदर्भात प्रबोधन केले आहे. या सर्व अंधश्रद्धांची मुळे धर्माच्या तात्विक व व्यावहारिक स्वरूपात आहेत. अंधश्रद्धा-ळू माणूस आपली विचारशक्ती हरवून बसलेला असतो. 'श्रद्धा' ही मानवी जीवनातील एक अमूल्य ठेव आहे. आई, वडील, गुरुजन यांच्याविषयीची श्रद्धाही खचितच अभिमानास्पद बाब आहे. पण कोणत्याही श्रद्धेच्या अतिरेक हा शेवटी अंधश्रद्धेत परिणीती होऊन समाजाला हानिकारक ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की महाडच्या चवदार तळ्याच्या संग्रामानंतर धर्ममार्तंडांनी तळ्यातील पाणी पवित्र करण्यासाठी पाण्यात गोमूत्र व गाईचे शेण धार्मिक भावनेने मिसळले होते. ही अंधश्रद्धा आहे. असे त्यांनी समाजाला सांगितले. तळ्यातील पाणी पवित्र करण्यासाठी पाण्यात गोमूत्र व गाईचे शेण टाकले तर ते पाणी पिण्यास योग्य राहणार नाही. असे समाजाला समजावले.

महाराष्ट्रात अंधश्रद्धानिर्मूलन चळवळीची व्याप्ती प्रामुख्याने बुवाबाजी, चमत्काराचा, भूत, पिशाच्च इ. अंधश्रद्धांची मुळे आहेत. अंधश्रद्धेचे शक्तिसामर्थ्य असलेल्या ईश्वरवाद, आत्मवाद, अवतारवाद या प्रवृत्तींची

मूलगामी चिकित्सा करीत असतो. भीती हे अंधश्रद्धेच्ये पहिले कारण आहे. मृत्यूची भीती, परीक्षेत नापास होण्याची भीती, नोकरी न मिळण्याची भीती इ. अशी अनेक भयानक उदाहरणे आहेत. ज्यात एखादी व्यक्ती असुरक्षित वाटते. आणि ती भीती घालवण्यासाठी माणूस अंधश्रद्धेच्या अवलंब करतो. आणि हेच त्याला अंधश्रद्धाळू बनवते. भारतात सर्वाधिक लोक हे अंधश्रद्धाळू आहेत. कारण तेथील लोकांचा देवावर खूप विश्वास आहे. आणि त्यामुळेच ढोंगी बाबा त्याच्या गैरफायदा घेतात. देवावर विश्वास ठेवणे ही वाईट गोष्ट नाही. पण त्याहूनही महात्वाचे म्हणजे खरे आणि खोटे ओळखण्याची क्षमता असणे हे गरजेचे आहे. मानवता हा कोणत्याही मानवाच्या सर्वोच्च धर्म मानला पाहिजे.

तुकाराम महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वीर सावरकर, गाडगेबाबा इ. साऱ्या भारताने विस्मयाने आणि असूयेने पाहावे अशी प्रबोधनाची एक ज्वलंत परंपरा आपल्या महाराष्ट्राला लाभली. त्याच आपल्या महाराष्ट्राला आज बुवांची प्रचंड भुताव‌ळ आणि बुवाबाजीची दलदल सर्वत्र पसरली आहे. समाजाच्या नाश करायला निघालेल्या असंख्य बुवांचे काळे कारनामे... कथित दैवी चमत्कारांचे सत्यस्वरूप त्यांच्या जाळ्यात सापडणाऱ्या जनमानसाचे वैज्ञानिक विश्लेषण आणि संतांनी अंधश्रद्धेचे निर्मूलन केलेले कार्य बुवाबाजीशी केलेला मुकाबला समाजामध्ये प्रबोधन, जागृती करतो.

मानवाच्या कल्पनाशक्तीतून अनेक अंधश्रद्धांना त्यांनी जन्म दिला आहे. मांजर आडवे गेले की काम होत नाही, पाल चुकचुकली की ते अशुभ असते, बाहेर जाणाऱ्याला कुठे जातो असे विचारू नये, तसे विचारल्यास त्याचे काम होत नाही. हे ह्या अंधश्रद्धांचे काही नमुने आहेत. मांजर वाटेने जाऊ शकलेच ना, कित्येका वाटेत आपणही आडवे येतोच की.

चुकचुकणे ही पालींची एकमेकींना संदेश देण्याची भाषा आहे. आपले अशुभ व्हावे म्हणून ती चुकचुकत नसे. पूर्वी देवी आल्या की मरीआईच्या प्रकोप झाला असे मानत. लोकांच्या आणि पटकीच्या साथीत भरपूर माणसे मरायची. त्यावेळेसही भगताला बोलावून उपचार केले जात. महारोग झाला की ते मागच्या जन्मीचे पाप आहे असे समजले जाई आणि त्या माणसाला वाळीत टाकले जाई. आता हे आजार कुठल्या विषाणूमुळे होतात ते विज्ञानाने शोधून काढले आहे आणि त्यावरचे उपायही शोधून काढले आहेत. त्यामुळे कित्येकांचा जीवही वाचतो. एखादा माणूस वेड्यासारखे वागू लागला की त्याला भूत लागले आहे असे समजून मारहाण केली जाते. ते अगदी चुकीचे आहे. त्याऐवजी त्याला मानसोपचार तज्ञाकडे न्यायला हवे. गुप्त धन मिळवण्यासाठी लहान मुलांच्या बळी द्यावे अशा सारख्या कित्येक अघोरी अंधश्रद्धाही आजही समाजाच्या काही वर्गात अजूनही आहेत.

प्राचीन काळापासून हॉटेल्सच्या तेरावा मजला किंवा खोली क्रमांक १३ ठेवण्यास नकार देतात कारण लोक मानतात की १३ क्रमांक अशुभ आहे. आरसा तुटला किंवा दूध फुटले तर लोक कामासाठी बाहेर पडत नाहीत, कारण ते अशुभ मानले जाते. अंधश्रद्धा टाळण्यात स्वारस्य गेल्या काही वर्षांत स्पष्टपणे कमी झाले नाही कारण अंधश्रद्धेवर विश्वास ठेवल्याने मागासलेली विचारसरणी आणि जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोन अभाव दिसून येतो. अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांवर अनेकदा शारीरिक आणि लैंगिक अत्याचार केले जातात. अनेकांना बाबा आणि 'साधू' करून होणारे शोषण सहन करावे लागते. प्राण्यांची हत्या हा अनेकदा अंधश्रद्धेचा भाग असतो. गरीब आणि अंधश्रद्धाळू लोक आधुनिक आरोग्य व्यवस्थेवर अवलंबून न राहता क्षुद्र लोकांकडून उपचार घेतात. जादूवरील विश्वासामुळे लोक जादूटोण्याकडे

आकर्षित होतात. जादूटोण्याच्या प्रथेच्या मुलांच्या आणि स्त्रियांच्या मानसिकतेवर गंभीर परिणाम होतो. ज्या लोकांचा स्वतःवर विश्वास नाही आणि त्यांच्या मेहनतीवर विश्वास नाही अशा लोकांची दिनचर्या अधिक सोपी आणि सुरक्षित असते. म्हणूनच हे लोक अंधश्रद्धेवर सहज विश्वास ठेवतात. शिवाय, हे देखील कारण आहे की बहुतेक अंधश्रद्धा ही एखाद्या व्यक्तीच्या मालमत्तेची हानी आणि नुकसान होण्याच्या भीतीशी संबंधित असतात. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील लोक जास्त अंधश्रद्धाळू असतात.

चमत्कार हे बुवाबाजीचे मोठे हत्यार आहे. आपापले बाबा, बाई, महाराज यांच्या हातून झालेल्या चमत्कारांमुळे त्यांच्यापुढे भक्तगण सदैव माथा टेकून उभा असतो. तो त्यामागील सत्यता तपासण्यासाठी कधीच उत्सुक नसतो. यामुळेच बाबांचे फावते. चमत्कार म्हणजे भूत, प्रेत, भानामती, चेटूक, जादूटोणा मूठ मारणे, करणी करणे. भानामती घडते म्हणजे कपडे आपोआप पेटतात. चेटूक झाले की घरातील शस्त्र आपोआप कमी होते आणि शेजाऱ्याचे धान्य दुप्पट होऊन जाते. अंगात संचार झालेली व्यक्ती १०-१२ जणांना आवरत नाही. हे असे चमत्कार बुवा दाखवतात. अशा गोष्टीतून अंधश्रद्धा निर्माण होते. व अशा गोष्टी लोकांना खऱ्या वाटतात व लोक त्यावर विश्वास ठेवतात. चमत्कार करणारे जे जे बाबा, बुवा, महाराज आहेत, त्यांच्याबाबत भक्तगणांच्या हा नेहमीचा प्रश्न असतो, की डोळ्यासमोर घडलेले नाकारायचे तरी कसे असा प्रश्न उभा राहतो. चमत्कार म्हणजे बदमाशी असते वा हातचलाखी अथवा रासायनिक, भौतिक, यांत्रिक करामत किंवा अगदीच झाले तर निसर्गाचे न उलगडलेले एखादे कोडे असते. परंतु विज्ञानाच्या नियमांबाहेर त्यांमधील काहीही नसते.

चमत्कार मानणारे असे लोक धर्माकडे तरी कशाला जातात? त्यांना वासना आणि स्वार्थ सोडावयाचा असतो, उदात्त आणि पवित्र व्हावयाचे असते, म्हणून ते धर्माकडे जात नाहीत. या लोकांना देवही शरीराच्या सोयीसाठी हवा असतो. कुणाला नोकरी हवी असते, कुणाला बढती हवी असते, कुणी काळाबाजार करुन अडकलेला असतो, अपव्यवहार करणारा असतो, त्यातून त्याला सुटावयाचे असते. कुणाला नोटा दुप्पट करुन हव्या असतात, रोगमुक्ती हवी असते आणि बहुतेकांना विविध प्रकारची पापकृत्ये करण्यात जन्म जात असल्यामुळे सदसद्विवेकबुद्धीची टोचणी लागलेली असते. पाप करणे न सोडता, पापामुळे जो लाभ झाला असेल तो लाभ न सोडता, जर स्वतःच्याच विवेकबुद्धीच्या टोचणीतून मुक्त व्हावयाचे असेल, तर असा चमत्कार करणाऱ्या साधुसंतांना शरण जाण्याइतका दुसरा सोपा मार्ग नसतो. माणसे धार्मिक प्रवृत्तीची असल्यामुळे चमत्कारप्रधान बुवाबाजीच्या मागे लागतात अशी वस्तुस्थिती नसून खरी धार्मिक प्रवृत्ती नसल्यामुळे व धर्म आपल्या भ्रष्टतेला सहकार्य देईल अशी आशा वाटत असल्यामुळे चमत्कार व बुवाबाजी यांच्यामागे लोक लागतात.

लोकांना संतांनी केलेले चमत्कार आवडतात. ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडी वेद वदवले स्वरूपाचे असंख्य चमत्कार संतांच्या नावावर चिकटवलेले असतात. संत ही हाडामांसाची माणसे होती. माणसांच्या मर्यादा त्यांनाही होत्या. परंतु तरीही स्वतःच्या अनुभवातून, विचारांतून, कृतीतून त्यांनी लोकांना जागृत केले म्हणूनच तुकोबा

'सत्य असत्यासी मन केले ग्वाही।
मानियले नाही बहुमता।'

असे म्हणू शकतात.

आपला समाज व आपला देश अंधश्रद्धेपासून मुक्त करायचा असेल तर सर्वप्रथम आपण स्वत:ला सुधारायला हवे तरच आपण समाजाला जागरूत करू शकतो. प्रत्येकाच्या जीवनात काही ना काही समस्या येतच असतात पण ते सोड-वण्यासाठी आपण काही भोंदू बाबांच्या, साधू, तांत्रिकांच्या भानगडीत पडावं असं नाही. पैशाच्या लोभापायी असे भोंदू लोक कुठेही बेकायदेशीर काम करत असतात. आपला आपण स्वत:शीच शोध घ्या. बुद्धीला कौल लावा. मूल्यभावनेला प्रतिसाद दयावा.

त्यामुळे प्रगती करायची असेल तर आजच्या दिवशी मी अंधश्रद्धा ठेवणार नाही आणि जो कोणी ठेवेल त्याची अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करेन असे वचन देऊन ही अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करू. ह्या अंधश्रद्धांच्या बीमोड झाला पाहिजे. माणसाने विज्ञानाची आणि प्रयत्नवादाची कास धरली पाहिजे. जन्माला येणारा प्रत्येक माणूस हा केव्हातरी मरणार असतोच. त्यामुळे कुणाच्याही मरणातूनही भलतेसलते अर्थ काढू नयेत. आपले मन सक्षम करणे हेच सर्वात महत्वाचे असते हे लक्षात ठेवावे आणि अंधश्रद्धांच्या जळमटांची त्यातून हकालपट्टी करावी, आणि या अंधश्रद्धेच्या आपल्या भावी पिढ्यांवर परिणाम होऊ नये. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम आपण स्वत:पासून सुरू करू तेव्हाच अंधश्रद्धापासून मिळवी मिळेल. बुवा, बाबा यांचे बिंग फुटेल.

बुडती हे जन देखवेना डोळा।
म्हणोनि कळवळा येतो आम्हां ॥

मो= 9421591556
नाव :- सानिका दिनकर खरात
तालुका :- वाळवा, जिल्हा : सांगली
मु. पो : खरातवाडी
इयत्ता :- B. A - I
विषय :- संतांचे अंधश्रध्दा निर्मूलन समिती कार्य.

# संतांचे अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य

समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा व अंधश्रध्दा दूर करण्याचे व विवेकी विचार देण्याचे कार्य संतांनी केले. समाजातील वाढता विखार कमी करण्यासाठी संतांचे विचार व कार्याचा जनप्रबोधन वारसा महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती पुढे चालवत आहे, असे प्रतिपादन सोन्नर मुंबई येथील हभप श्याम सुंदर महाराज यांनी केले.

गाडगे बाबा जन्मभूमी शेंडगाव येथे महाराष्ट्र अंनिसच्या वतीने 15 ते 23 मे या कालावधीत आयोजित शेंडगाव ते पंढरपूर या वारसा संतांचा अंधश्रध्दा निर्मूलनाचा जनप्रबोधन यात्रेच्या शुभारंभप्रसंगी शामसुंदर महाराज बोलत होते. संत गाडगेबाबा यांचे जन्मस्थान शेंडगाव येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र अनिसचे राज्य सरचिटणीस माधव बावगे, राज्य अध्यक्ष महादेवराव भुईभार, शेंडगावचे सरपंच गजानन सोळंके, उपसरपंच स्वप्निल सावळे, विदर्भ सरचिटणीस प्रा. बनराव कानकिरड, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. संजय तिडके, अभियान प्रमुख मनोहर जायभाये, हनुमंत मुंडे, विनोद चोंडके, सुभाष वडूरकर, गाडगे बाबांचे पणतू नितीन जाणोरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गाडगे बाबांच्या जन्मस्थानी मान्यवरांच्या हस्ते वृक्ष रोपट्यास पाणी घालून या प्रबोधन यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. राज्य सरचिटणीस माधव बावगे यांनी प्रास्ताविकात शेंडगाव ते पंढरपूर जनप्रबोधन यात्रे मागील भूमिका स्पष्ट केली.

जन्मस्थानी मान्यवरांच्या हस्ते वृक्ष रोपट्यास पाणी घालून या जनप्रबोधन यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. राज्य सरचिटणीस माधव बावगे यांनी प्रास्ताविकात शेंडगाव ते पंढरपूर जनप्रबोधन यात्रेच्या

Date: / /

आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

महादेवराव भुईभार यांनी संत गाडगेबाबांच्या वेशभूषेत कीर्तन सादर केले. सरपंच गजानन सोळंके यांनी महाअनिसच्या उपक्रमास शुभेच्छा देऊन गाडगे बाबा जन्मभूमी विकासास सहकार्य करण्याचे आवाहन केले. तर विनोद चोंडके यांनी आभार मानले. ही जनप्रबोधन यात्रा पुढे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मोझरी येथे जाणार असून, पुढे मुक्ताईनगर मार्गाने पंढरपूर पोहचणार आहे. या कार्यक्रमास गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोहन बुंदेले, वैष्णवी आसेकर, राजश्री इंगळे, प्रा. प्रवीण काळे, प्रदीप साबळे यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

अंधश्रध्दा निर्मुलन संस्थेच्या वतीनं राज्यातल्या जनतेला संतविचार आणि अंधश्रध्दा निर्मुलन या विषयी जनप्रबोधन व्हावं यासाठी सुरू करण्यात आलेली 'वारसा संतांचा, अंधश्रध्दा निर्मुलनाचा' ही जनप्रबोधन यात्रा आज औरंगाबाद जिल्ह्यात दाखल होणार आहे. पैठण तालुक्यातल्या आपेगाव इथं ही यात्रा दाखल होणार असून, गवळीवाडा, दौलताबाद इथं प्रबोधनपर कार्यक्रम होणार आहे.

नरेंद्र अच्युत दाभोलकर हे मराठी बुध्दीवादी, विज्ञानवादी, समाजसुधारक व सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी अघोरी सामाजिक प्रथा व अंधश्रद्धांच्या निर्मुलनासाठी इ.स. १९८९ साली समविचारी कार्यकर्त्यांना जमवून महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती ही संघटना स्थापली. ते स्वतः या संघटनेचे संस्थापक कार्याध्यक्ष होते. नरेंद्र दाभोलकर यांची मंगळवार दि. 20 ऑगस्ट, 2013 रोजी सकाळी साडेसात वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिराजिक असलेल्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर (ओंकारेश्वर पुलावर) अज्ञातांनी ४ गोळ्या झाडून हत्या केली.

2017 मध्ये, भारताच्या गृह मंत्रालयाने विदेशी योगदान (नियमन) कायदा, २०१० अंतर्गत परकीय निधीचा खुलासा न करण्याबद्दल महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. संघटनेमध्ये आर्थिक गैरव्यवहार आहेत, अशा स्वरूपाच्या तक्रारी आल्यानंतर कागदपत्रे तपासताना त्रुटी आढळल्या आहेत असे समितीचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी सांगितले आहे.

अनिष्ट व अघोरी प्रथा, जादूटोणा व पिशाच बाधा इत्यादींमुळे तसेच, भोंदूबाबा यांच्याकडून समाजातील सामान्य जनतेचे सामाजिक, शारीरिक वा आर्थिक नुकसान व शोषण होण्याच्या घटना फार मोठ्या संख्येने उघडकीस येत असून हे प्रमाण अत्यंत भयावह आहे. जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती, भोंदूबाबा यांचा आपल्याकडे अद्भुत आहे. चमत्कारी उपाय किंवा शक्ती असल्याचा खोटा दावा आणि यांची समाज विघातक व नुकसानकारक कृत्ये यांमुळे समाजाची घडीच विस्कटण्याचा आणि अधिकृत व शास्त्रीय वैद्यकीय उपाय व उपचार यांवरील सामान्य जनतेच्या विश्वासाला तडा जाण्याचा धोका निर्माण झाला आहे आणि या अंधविश्वासामुळे व अज्ञानामुळे ते अशा भोंदूबाबा आणि जादूटोणा करणाऱ्या व्यक्तींचा आश्रय घेत आहेत. अशा परिस्थितीत, जादूटोणा करणाऱ्या या व्यक्ती, भोंदूबाबा यांच्या कुटिल कारस्थानांना बळी पडण्यापासून सामान्य जनतेला वाचवणे व अशा अनिष्ट परिणामांना परिणामकारकरित्या आळा घालण्यासाठी आणि त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी व या नुकसानकारक प्रथा, परिपाठ व रूढी, तसेच जादूटोण्यावरील विश्वास आणि अशा इतर अनिष्ट अघोरी प्रथा यांचा प्रसार रोखण्यासाठी उचित व कठोर सामाजिक व कायदेविषयक उपाय योजना करणे शासनाला अत्यावश्यक झाले आहे.

प्रस्तावित अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

– जादूटोणा करणे आणि अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे या शब्दप्रयोगांची व्याख्या देऊन, भोंदूबाबा यांच्याकडून करण्यात येणारा जादूटोणा, अवलंबिल्या जाणाऱ्या अनिष्ट व अघोरी प्रथा, तसेच, केली जाणारी अधिकृत व बेकायदेशीर वैद्यकीय औषध योजन व उपचार यांच्या प्रसाराला व प्रचाराला प्रतिबंध करण्यात आला आहे. या अधिनियमान्वये या गोष्टी करणे हा अपराध ठरविण्यात आलेला आहे आणि या अधिनियमाची जरब बसविण्यासाठी असे अपराध दखलपात्र व अजामीनपात्र ठरविण्यात आले असून, त्यासाठी, अत्यंत कठोर शिक्षेची तरतूद करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

Date : / /

- या अधिनियमांच्या व नियमांचे तरतुदींचे उल्लंघन होत आहे किंवा कसे, याचा तपास करणे व त्याला प्रतिबंध करणे, तसेच या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर परिणामकारकरित्या खटले चालविले जाण्यासाठी साक्षीपुरावे गोळा करणे, याकरिता, एक दक्षता अधिकारी असण्याची तरतूद करण्यात आली आहे.
- ज्याने या कायद्याच्या तरतुदींखील अपराध केला आहे अशा व्यक्तीच्या दोषसिद्धी संबंधातील तपशील प्रसिद्ध करण्यासंबंधीचे अधिकार न्यायालयाला प्रदान करू शकेल अशी साहाय्यकारी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे.
- इतर आनुषंगिक व संबंधित बाबी.

वरील उद्दीष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतु आहे.

२. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आपण

नाव :- पूजा सुनिल लोहार
वर्ग :- B.com III
पत्ता :- ब्राम्हणपुरी इस्लामपूर.
मोबाईल नंबर :- 7709680514

मूल्यशिक्षण शाळेमधे शिकवले जाते. त्या मूल्यशिक्षणात "वैज्ञानिक दृष्टिकोण" महत्वपूर्ण मानला आहे.!
मग नेमकं वैज्ञानिक दृष्टिकोण म्हणजे तरी काय...
'कुठल्याही घटितामागचा कार्यकारण भाव समजून घेणे किंवा दोन घटनांमधील परस्परसंबंध तपासून पाहणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोण!"
अशी एकदम साधी - सोपी व्याख्या करता येईल!
किंवा असेही म्हणता येईल की 'जेवढा पुरावा उपलब्ध आहे, तेवढा विश्वास ठेवणे."
विज्ञानाने आलेले बदल धर्माला काळाच्या ओघात स्वीकारवे लागले.. आजवर धर्माने एक ही मानवी प्रगतीसाठी नविन शोध घेण्याचा नाही वैज्ञानिक दृष्टिकोण आत्मसात करताना सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे छद्म विज्ञान यापासून सावध असले पाहिजे उदाहरण म्हणजे 'वास्तु शास्त्र जोतिष शास्त्र." आज समाजात अनेक गोष्टी यामध्ये विज्ञान आहे. असं सांगून जनसमान्यांच्या माथी थोपल्या जातात त्या गोष्टीत नक्की विज्ञान आहे का, हे वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे विज्ञानाला आज सगळ्या गोष्टींची कारणे माहित नाहीत, पण ती कारणे वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या आधारेच समजू शकतात. "आपल्या जीवनात आज जे जे काही घडतं, त्यामागे पूर्व संचित आहे नियती आहे नशीब आहे.
पूर्वजन्मीचं पाप आहे. असं समजणे हा पळपुटेपणाचा मार्ग आहे कष्टाला पर्याय नाही. हे वैज्ञानिक दृष्टिकोण सांगतो..
आत्मा - परमात्मा, जन्म - मृत्यु, प्रारब्ध - संचित, नशीब - मोक्ष यांची मांडणी अनेक धर्मांनी, अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने केलेली आहे.
धर्माच्या शिवाय माणसाच्या विवेकातून नाती निर्माण होऊ शकते, असे वैज्ञानिक दृष्टिकोण सांगतो...
वैज्ञानिक दृष्टिकोण नेहमीच नम्र असतो. मी सांगितलेला शब्द अंतिम सत्य असा दावा तो करत नाही.

वैज्ञानिक दृष्टिकोण म्हणजे काय ?

* कुठल्याही घटितामागचा वैज्ञानिक दृष्टिकोण " निरीक्षण, तर्क, अनुमान प्रचिती आणि प्रयोग." या मार्गांनी ज्ञान आत्मसात करण्याची विज्ञानाची ही पद्धत आहे.*

1) वैज्ञानिक दृष्टिकोण शब्दप्रामाण्य म्हणजे कुणी एका मोठ्या व्यक्तीने सांगितले म्हणून खरे मानायचे, हे नाकारतो. वैज्ञानिक दृष्टिकोण ग्रन्थप्रमाण्य म्हणजे कुणाच्या तरी पुस्तकात लिहलंय म्हणून ते चिकित्सा न करता स्वीकारणे नाकारतो..

2) चमत्काराचा दावा करणे हे लोकांना मूर्ख काढण्याचं प्रभावी साधन आहे. कोणतीही गोष्ट कारणाशिवाय घडत नाही. चमत्कार करणारे बदमाश असतात, त्यावर विश्वास ठेवणारे मुर्ख असतात. आणि त्याला विरोध न करणारे भ्याड असतात. चमत्कारामागे हातचलाखी वा विज्ञान यापैकी काहीतरी एक असते.

3) जगात सुष्ट शक्तिमुळे चांगले आणि दुष्ट शक्तिमुळे वाईट घडते असे अजिबात होत नाही. जे काही घडते त्यामागे निश्चित कारण असते, आणि ते वैज्ञानिक दृष्टिकोनाच्याच आधारे शोधता येते.

4) आजवर झालेली माणसाची प्रगती केवळ 'विज्ञानाच्या' आधारे झालेली आहे विज्ञान नेहमीच नम्र असते, ते नवनवीन बदलांना आत्मसात करतं. धर्माप्रमाने ते अंतिम सत्याचा दावा अजिबात करत नाही.

5) मानवाचा आजवरचा इतिहास हा श्रद्धा तपासण्याचा इतिहास आहे. विज्ञानामुळे झालेले बदल धर्माला काळाच्या ओघात स्वीकारावे लागले आहेत.
* आजवर धर्माने एकही मानवी प्रगतीसाठी नविन शोध लावलेला नाही.*

6) * वैज्ञानिक दृष्टिकोण आत्मसात करताना सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे छद्य विज्ञानापासून सावध राहिले पाहिजे. छद्य विज्ञानाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वास्तु शास्त्र, जोतिष शास्त्र..

8

7) आपल्या जीवनात आज जे जे काहि घडतं, त्यामागे पूर्व संचित आहे, नियती आहे, पूर्वजन्मीचे पाप आहे. असं समजणे हा पळपुटेपणा आहे. कष्टाला पर्याय नाही, हे वैज्ञानिक दृष्टिकोण सांगतो.

8) * धर्माशिवाय माणसाच्या विवेकातून नीती निर्माण होऊ शकते, असे वैज्ञानिक दृष्टिकोण सांगतो *

'वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करा' हे म्हणणे मात्र अवैज्ञानिकपणाचे वाटते वैज्ञानिक दृष्टिकोन हा शब्द ठेवला तरीसुद्धा चिकित्सक दृष्टिकोन निर्माण करा असे म्हणण्यात काहि अर्थ नाही. एवढे मात्र खरे की ज्यांना हा चिकित्सक दृष्टिकोन उपजत लाभलेला आहे ज्यांना त्याचा वापर मुक्तपणाने करता येणे न येणे हे आजूबाजूच्या परिस्थितीवर पुष्कळसे अवलंबून असते. आपली हजार-दीड हजार वर्षांची 'गप्प बसा' संस्कृती चिकित्सक दृष्टिकोन गुदमरवून टाकत आली. 'भस्मीतस्य देहस्य पुनरागमनं कुत:' असा प्रश्न विचारणारा एखादाच किंवा 'गाय ही देवता नव्हे, फक्त उपयुक्त पशु आहे,' असे सांगणारा एखादाच सावरकर या संस्कृतीत निर्माण होत असते. आणि तेही कालांतराने विस्मृतीस गडप होतो. उद्विग्न करणारी ही वस्तुस्थिती आहे इतके खरे; तिच्याशी मुकाबला करू इच्छिणाऱ्यांनी एकत्रितपणे कार्य करणे एवढेच त्यांच्या हाती आहे.

आपल्याला जेवढे शक्य असले तेवढे कार्य करीत रहावे. त्यांची मन: प्रवृत्ति त्यांना हे कार्य करायला भागच पाडील. आपला मुकाबला हा किती प्रतिकूल वस्तुस्थिती आहे. आपल्यापुढे मोठ्यात मोठे उद्दिष्ट केवढे ठेवता येईल. याचा विचार मनात जागा ठेवून आपली कार्यकक्षा ठरवावी. असे केल्याने निराशेने खचून जाण्याची वेळ यायची नाही. आपल्या संघटित अस्तित्वाचा जो एक प्रकारचा दबाव निर्माण होतो. त्यामुळे घातक रूढी-परंपरा जोपासणाऱ्यांचे मतपरिवर्तन जरी झाले. तरी त्यांच्या उद्योगांना काही प्रमाणात पायबंद बसतो यात काहि संशय नाही आणि एवढ्याच फलिताची अपेक्षा ठेवावी.

'बुडती हे जन, न पाहवे डोळा" अशी ज्ञालेली आहे त्यांनी काय करायचे? हात जोडून स्वस्थ बसायचे? मुळीच नाही.

वैज्ञानिक दृष्टीकोन हे वाक्य आपल्या देशात मुख्यत: विज्ञानाशी संबंधीत गोष्टींशी, म्हणजे जे आपण बेसीक विज्ञान समजतो त्या फिजिक्स, केमिस्ट्री आणि जीवशास्त्र या तीन शाखांनी, मर्यादीत असतो असा आपला सर्वसाधारण समज. रोजच्या जगण्याच्या प्रत्येक गोष्टीत विज्ञान आहे,

विषय कोणताही असो, 'असं का' हा प्रश्न स्वतःला पडणं म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन असं मला वाटतं. आपण अंधश्रद्धा या लेबलखाली अनेक गोष्टींवर विचार करायचं टाळतो, शेवटी विज्ञान या शब्दाला सामान्य अर्थ विशेष ज्ञान असा होतो. आपल्या या प्रथा- परंपरा किंवा दैवतं यावर विशेष ज्ञान मिळवण्याचा फारसा प्रयत्न आपल्याकडे झालेला नाही आणि या सर्वांकडे अंधश्रद्धा म्हणून शिक्का मारला गेला.

सर्वच गोष्टींबद्दलचं स्वतःचं कुतुहल सतत जागृत ठेवणं म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन. त्याच निरीक्षण करून अभ्यास करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन. ज्ञानेश्वर बाराव्या शतकात म्हणून गेलेत, की "अगा अभ्यासाचेनि बळें, एकां गति अंतराळे, व्याघ्र सर्प प्रांजळ, केले एकीं.. विष की आहार पडे, समुद्री पायवाट जोडे, एकी वाग्ब्रह्म थोकडें, अभ्यासे केले..।।
आकाशात विहार करता येतो, अभ्यासामुळे वाघ आणि सर्प एकत्र खेळवता येतो,

जीवनातल्या प्रत्येक गोष्टीमागच्या कार्यकारण भावाचा तर्कसंगत विचार करणं म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन असं मी मानतो.

पुराणांमध्ये आढळणारे पुष्पक विमान ही एक आताचे विमानाची मुळ आकृती असं आताच्या काळात आपल्याला पटण्यासारखी नाही हे तर खरेच मर्यादीत असतो असा आपला सर्वसाधारण समज. मग ती कोणतीही साधी गोष्ट असो. पुढचे दोन पाय मागच्या दोन पायांच्या सरळ रेषेत नसतात. पायांच्या तुलनेत किंचित उजवीकडे पडतात. यातही विज्ञान आहेच. या विज्ञानाची सुत्र मांडता येतीलही, परंतू त्यात मुळात काही विज्ञान आहे हेच आपल्या गावी नसते आणि त्यामुळे 'असं का?' हा प्रश्न आपल्याला पडत नाही, हे मुख्य कारण हे आहे. 'राष्ट्रीय विज्ञान दिनी' वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय, यावर माझं मत, कोणीही न विचारता, मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हेच अंतीम सत्य असे माझे म्हणणं नाही, तर यावर चर्चा आपली मतेही अपेक्षित आहेत...

अशा विषयावर खुल्या चर्चा- संवाद होत राहिले तर त्याच्या एक फायदा असा होतो की आपले सामकिपरि लोक कोण ते समजल्यामुळे एक तर्हेचे ध्रुवीकरण होऊ शकते. शब्दप्रामाण्य मानणारे, विभूति पूजेच्या आहारी गेलेले आणि पोथीनिष्ठा बाळगणारे अंधश्रद्धाळू लोक सर्वच क्षेत्रात आढळतात एवढी गोष्ट मात्र ध्यानीत ठेवायची.

नाव :- शिवानी हरिश्चंद्र वायचळ.

इयत्ता :- BA-1

कॉलेजचे नाव :- मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

विषयाचे नाव :- फलज्योतिष एक थोतांड.

फोन नंबर - 9975160058

प्र फलज्योतिष म्हणजे काय?

जन्मवेळची ग्रहस्थिती, तसेच वेळोवेळी आकस्मात निर्माण होणारी ग्रहस्थिती यांचे संयुक्त परिणाम मानवावर होतात, असे मानून त्यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे फलज्योतिष पूर्वी ज्योतिष हा शब्द खगोलशास्त्र या अर्थाने वापरलेवापरा ज्योति हा शब्द आकाशातील ग्रहगोलांना उद्देशून आहे. त्यावेळी खगोलशास्त्र व फलज्योतिष वेगळे असे नव्हते. पण ज्योतिषाचे तीन स्कंध होते. सिद्धांत, संहिता आणि होरा. सिद्धांत हा पूर्णपणे खगोलगणिताचा भाग. संहिता स्कंधात ऋतुमान व त्यावरील नागरी जीवनातील कृत्य-म्हणजे कुठल्या नक्षत्रावर काय करावे भाग. होरा म्हणजे व्यक्तीच्या आयुष्यातील घटना वर्तवणे म्हणजे. थोडक्यात भविष्य. वेधशाळेतून ग्रहगतीचा अभ्यास करणे, ग्रहणाविषयी भाकीत वर्तवणे अशी कामे ज्योतिषी करत असे. त्याला राजाश्रय होता. जोहानीज केपलर (इ.स. 1571 - 1630) हा खगोलशास्त्रज्ञ ज्योतिषी म्हणूनच काम करत असे. तत्कालीन परिस्थितीत त्याला फलज्योतिषावरच उदरनिर्वाह करायला लागत असे. त्याला या गोष्टीचा कमालीचा उबग आला होता. तो एक ठिकाणी म्हणतो "फलज्योतिष हो ज्योतिःशास्त्राची (आताच्या खगोलशास्त्र या अर्थी) बदलौकिक कार्टी आहे. तिच्याखेरीज त्या बिचाऱ्या माऊलीला एक वेळच्या अन्नालादेखील महाग व्हावे लागते." पण नंतर नंतर ज्योतिःशास्त्र खगोलशास्त्र हा शब्दप्रयोग वापरला जाऊ लागला त्यामुळे ज्योतिष हा फलज्योतिष या अर्थाने वापरला जाऊ लागला.

गुरु गुरुबल कशासाठी बघतात?

विवाह, मुंज, गृहप्रवेश वगैरे महत्वाचे प्रसंगी गुरु या शुभ ग्रहाची साथ आहे की नाही हे पाहतात. हे मंगल प्रसंग असतात त्यामुळे अशा प्रसंगी अमंगल ग्रहाची वाकडी नजर पडून काही अमंगळ होऊ नये म्हणून गुरुबल बघितले जाते. गुरु हा ग्रह नैतिक बळ देतो, चांगले गुण वृद्धीगत करतो. ~~गुरुबळ बघितले जाते. गुरु हा ग्रह नैतिक बळ दे.~~ गुरु जर अनुकुल नसेल तर गुरुच्या सुवर्ण प्रतिमेचे पूजन करून तो अनुकूल करून घेता येतो.

मूळ नक्षत्र सासऱ्यास वाईट, आश्लेषा नक्षत्र सासूस वाईट असे म्हणतात ते कितपत बरोबर आहे?

वर आपण मूळ नक्षत्राच्या इतिहासात जे बघितले त्याचीच ही पुढची मालिका आहे. जेष्ठ दिरास वाईट वगैरे वगैरे... मुलगी सासरी आल्यानंतर जर काही दुर्घटना घडली तर त्याचे खापर खापर लगेच मुलीच्या पायगुणांशी जोडून काहीतरी उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच कुठेतरी नक्षत्राशी संबंध जोडून काहीतरी बादरायण संबंध प्रस्थापित केला जातो.

अमावस्येला अमावस्या पौर्णिमेला वेडाचे झटके, अपघाताचे प्रमाण जास्त का असते?

ही मूळातच चुकीची माहिती आहे. काही मूढवादाकडे झुकलेल्या नियतकालिकांत असली चुकीची माहिती काहीतरी सनसनाटी असाव म्हणून दिलेली असते. त्यासाठी दाखले म्हणून जे संदर्भ वा सर्व्हे दिलेले असतात. ते मूळातच शास्त्रीय नसतात. पण मनोरंजनासाठी वाचणारे वाचक मात्र त्यावर विश्वास ठेवतात आणि चिकित्सक लोक त्या नियतकालिकांच्या प्रकृतीनुसार त्याकडे कानाडोळा करतात, त्यामुळे असे समज फोफावतात.

आपल्याकडे येरवडा मनोरुग्णालयात असा अभ्यास तेथील डॉ. देव यांनी केला असता या समजुतीत काडीमात्र तथ्य नसल्याचे त्यांना संख्याशास्त्रीयदृष्ट्या आढळले. अंगात येणाऱ्या लोकांच्यात खूप किंवा धूप याचा वास, घागरी फुंकणे विशिष्ट वाद्य हे वातावरण व आज मंगळवार आहे, किंवा शुक्रवार आहे या स्वयंसूचनेच्या अंतर्भाव हा जसा महत्त्वाचा घटक असतो. तसा काहीसा प्रकार म्हणून चंद्रकलांशी... बदल हा भाग काही मनोरुग्णांच्याबाबत असू शकतो. पण वेडाचा झटका, आत्महत्या वा तसा प्रयत्न, इपिलेप्सी या गोष्टींचा चंद्राच्या कलांशी काहीही संबंध नाही. अपघातांचे प्रमाण या वेळेस वाढते या दाव्यात तर काहीच तथ्य नाही. यासाठी ... असलेला सर्व्हे हा तुम्ही आम्ही केवळ वर्तमानपत्रातल्या बातम्यांवरून संकलित केला तरी आपल्या सहज लक्षात येईल.

# बुवाबाजी

लोखंडी तार ! जिभेतून आरपार !!

माळावरच्या देवीची यात्रा होती. देवीचे देऊळ गावापासून ५ किलोमिटर अंतरावर आहे. कॅनॉलच्या काठा कायने देवीला जाण्याचा रस्ता आहे.

रस्त्याच्या कडेला अघोरी विद्या जाणणार अनेक गोसावी, अनेक चमत्कार करून लोकांना आकर्षित करत होते. संगम पुलावरील गोसाव्याजवळ विशेष गर्दी होती. गोसाव्याने ९ इंच लांबीची लोखंडी तार जिभेतून आरपार घातली होती. त्याच्या पुढील पोत्यावर पैशाचा ढीग पडला किंवा होता.

"सावदा मोठी जखम, रक्ताचा टिपूस नाही !" एक एकमेकांना दुसऱ्याला सांगत होते.

साहित्य - दोन-तीन मिलिमिटर टोकदार तार तयार करून घ्या जाडीची नऊ इंच लांबीची तार. तार वाकवून १ ते १.५ इंच लांबीचा इंग्रजी यू अक्षराचा आकार करून घ्या.

पद्धती - वरील आकाराची टोकदार तार तयार करून घ्या. उजव्या हाताचा अंगठा व चार बोटे यामध्ये तारेचा यू पकडा. जीभ बाहेर काढा. डावा हात जिभेसमोर धरा. त्यामुळे प्रेक्षकांना जीभ दिसणार नाही. जिभेच्या वरून उजव्या हातात धरलेली तार खाली सरकवा आणि जीभ यू मध्ये अडकवून, यू दाताखाली दाबून धरा. तार वरच्या व खालच्या ओठांना टेकवा. दोन्ही हात बाजूला करा व जिभेत घुसलेली तार दाखवा.

स्पष्टीकरण - तारेच्या यू आकारामुळे तार जिभेला वरून व खालून टेकलेली दिसते. त्यामुळे तार जिभेतून आरपार गेल्याचा भास होतो.

दक्षता - हात व तार प्रयोगापूर्वी स्वच्छ धुवून घ्या.

IKON Page No.
Date / /

वास्तवाचे सम्यक आकलन हा बुद्धिनिष्ठेचा पाया आहे. आवड-नावड-निवड टाळून आकलन केले तर ते वास्तवाच्या जास्तीत जास्त जवळचे असण्याची शक्यता आहे. वास्तवाचे सम्यक आकलन झाले तरच विपरीत वास्तव बदलण्याचा मार्ग सापडू शकतो. आकलनातील त्रुटींमुळे आमच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी अपेशी होतात. काय, त्याची तपासणी केली पाहिजे. तशी तपासणी करण्याचे टाळले तर चळवळीच्या प्रयत्नांनाही अपयश येण्याची शक्यता आहे.

